बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | रविवार,दि.१३ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक७१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## दहशतवादी घुसखोरीच्या प्रतीक्षेत

दिल्ली:जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रणरेषेपलिकडील तळावर जवळपास १५० दहशतवादी काश्मीर खोऱ्यात घुसखोरी करण्यासाठी प्रतीक्षा करत आहेत अशी माहिती सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) वरिष्ठ अधिकाऱ्यानी शुक्रवारी दिली. हिवाळा जवळ येत असल्यामुळे ते घुसखोरीची तयारी करत आहेत. मात्र, सुरक्षा दले त्यांचा अशा प्रकारचा प्रत्येक प्रयत्न उधळून लावतील, असे या अधिकाऱ्याने सांगितले.बीएसएफचे महानिरीक्षक (काश्मीर आघाडी) अशोक यादव यांनी शुक्रवारी पत्रकारांना सुरक्षा दलांच्या सज्जतेबद्दल माहिती दिली. ते म्हणाले की, घुसखोरीचे प्रयत्न सुरूच राहतात. विविध गुप्तचर विभागांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आम्ही सीमेवर वर्चस्व राखण्याची योजना आखण्यासाठी सैन्याशी समन्वय साधतो. त्यासाठी आम्ही त्यांच्या तळावरील दहशतवाद्यांची संख्या लक्षात ठेवतो. त्यामुळे आम्हाला रणनीतीला आखताना मदत होते.

रणनिती:दसरा मेळाव्यातून पंकजा मुंडेंचा इशारा कोणाला?

# दसरा मेळावा

गर्जना : मनोज जरांगे पाटलांचा मेळाव्यातून इशारा

## आपला डाव खेळायचा की नाही?



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात दसरा मेळाव्याची मोठी परंपरा आहे. या पार्श्वभूमीवर आज बीडमधील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर भाजपाच्या नेत्या, आमदार पंकजा मुंडे यांचा दसरा मेळावा पार पडला. या मेळाव्यात कृषीमंत्री धनंजय मुंडे हे देखील उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे यांच्या या मेळाव्याकडे राज्याचं लक्ष लागलं होतं. या मेळाव्यात बोलताना पंकजा मुंडे यांनी हिंदीमधून एक कविता म्हणत आपल्या भाषणाला सुरुवात केली.

मैं गोपीनाथ मुंडे की बेटी हू, असं म्हणत त्यांनी भाषणाला सुरुवात केली. दरम्यान, यावेळी पंकजा मुंडे यांनी आपल्याला आपला डाव खेळायचा की नाही?, असं म्हणत वंचितांना, दलितांना त्रास दिला तर हिशेब केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा पंकजा मुंडे यांनी कोणाचेही नाव न घेता दसरा मेळाव्यातून दिला.मैं गोपीनाथ मुंडे की बेटी हू, असं म्हणत पान २ वर...

### ‘आपला डाव खेळायचा की नाही?’

मी दसरा मेळाव्याला दरवर्षी आल्यानंतर तुम्हाला सर्वांना साष्टांग नमस्कार घालते. मी तुम्हाला साष्टांग नमस्कार का घालते? कारण माझ्या वडिलांनी तुमची जबाबदारी माझ्या झोळीत टाकली. मी वियजी झाल्यावर तुम्ही मला मोठा मान दिला. पण माझा पराभव झाल्यानंतरही तुम्ही मला त्याहीपेक्षा जास्त मान दिला. आता तुम्हा सर्वांना मान देण्यासाठी मी प्रत्येक गावागावात आणि महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात दौऱ्याला येणार आहे. आपल्याला आपला डाव खेळायचा की नाही?, या मंचावर अठरा पगड जातीचे लोक आहेत. या ठिकाणी सर्व धर्माचे लोक आले आहेत, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे.



## यावेळी उलथापालथ करावीच लागणार



बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाचा प्रश्न चर्चेत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अनेकदा उपोषण आणि आंदोलन केलं. मात्र, अद्याप राज्य सरकारने त्यांच्या मागणीबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. यातच आता दसऱ्यानिमित्त मनोज जरांगे पाटील यांचा श्री क्षेत्र नारायण गड, बीड येथे दसरा मेळावा पार पडला



या दसरा मेळाव्यासाठी लाखो मराठा बांधव नारायण गडावर आले होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांचा हा मेळावा महत्वाचा मानला जात आहे. या मेळाव्यातून मनोज जरांगे यांनी सत्ताधाऱ्यांना मोठा इशारा दिला आहे. आपल्याला यावेळी उलथापालथ करावीच लागणार, असं मोठं विधान मनोज जरांगे पाटील यांनी दसरा मेळाव्यात बोलताना केलं आहे. एवढी गर्दी या मेळाव्याला होईल असं वाटलं नव्हतं. या मेळाव्याच्या चारही बाजूला माध्यमांचे कॅमेरे फिरवा, समोरच्यांचा कार्यक्रम होईल. कधी वाटलं नव्हतं की आपण एवढ्या मोठ्या ताकदीने या ठिकाणी पान २ वर...


### आचारसंहिता लागेपर्यंत धीर धरा

तुमच्या सर्वांच्या मनात जे आहे तेच मी करणार आहे. मी जाता जाता एवढंच सांगतो. आचारसंहिता लागल्यानंतर मी तुम्हाला आपली मुख्य भूमिका सांगणार आहे. मात्र, आचारसंहिता लागेपर्यंत आपल्याला धीर धरायचा आहे. सरकारला सांगतो सुट्टी नाही. पण आचारसंहिता लागल्यावर तुम्ही सर्वांनी माझं ऐकायचं. ते काय करतात हे सगळं आपण पाहायचं. त्यानंतर त्यांनी सगळं करेपर्यंत आपण कोणताही निर्णय घ्यायचा नाही. त्यांनी सगळं केल्यावर आपण निर्णय घ्यायचा. तुमच्या मनात जे आहे, तेच पूर्ण करायची जबाबदारी माझी आहे. तुमची शान मी वाढवल्याशिवाय राहणार नाही, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

## कुटुंब उद्ध्वस्त, सरकारला जाग कधी?

रेल्वे अपघात: राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल





दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

तामिळनाडूमधील तिरुवल्लूर जिल्ह्यातील कावरपेट्टई रेल्वे स्थानकावर दरभंगा एक्सप्रेसने मालगाडीला धडक दिल्याची घटना शुक्रवारी रात्री (११ ऑक्टोबर) घडली. या अपघातात दरभंगा एक्स्प्रेसचे तीन डबे रुळावरून घसरले, तर दोन डब्यांना आगही लागली होती. अपघाताची माहिती मिळताच रेल्वे तसेच अग्निशनदलाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. या अपघातात ९ प्रवाशी जखमी झाले. जखमी झालेल्या प्रवाशांवर उपचार सुरु आहेत. दरम्यान, या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

गेल्या काही महिन्यांत रेल्वे अपघाताच्या अनेक घटना समोर आल्या. त्यामुळे रेल्वे प्रशासनावर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या रेल्वे अपघाताच्या घटनेवरून केंद्र सरकारवर हल्लाबोल पान २ वर...

## बाबा सिद्दीकी गोळीबारात ठार!

खळबळ: घटनेने महाराष्ट्र हादरला

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते, माजी आमदार आणि माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची मुंबईत गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या घटनेने महाराष्ट्र हादरला आहे. पुन्हा एकदा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गृहखात्याच्या



कारभारावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी केली आहे. आपण जाणून घेऊ कोण होते बाबा सिद्दीकी?कोणत्याही राजकीय पक्षासाठी सत्तेच्या, बेरजेच्या राजकारणात बाबा सिद्दीकीसारखे पान २ वर...

## बांगलादेशात मंदिर हल्ल्यांची दखल

देशविदेश: परराष्ट्र मंत्रालयाकडून चिंता व्यक्त



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

बांगलादेशामध्ये दुर्गोत्सवादरम्यान पूजा मंडपावर झालेला हल्ला तसेच काली मंदिरात झालेली मुकुट चोरी यांची गंभीर दखल घेण्यात आल्याचे भारताच्या परराष्ट्र विभागाने शनिवारी स्पष्ट केले. बांगलादेशातील हिंदू, सर्व अल्पसंख्याक आणि त्यांची प्रार्थनास्थळे यांची सुरक्षा आणि सुरक्षितता यांची काळजी घ्यावी अशी विनंती भारत सरकारतर्फे करण्यात आली.बांगलादेशात हिंदूंच्या प्रार्थनास्थळी होणाऱ्या हल्ल्यांचे वर्णन परराष्ट्र मंत्रालयाकडून खेदजनक असे करण्यात आले आहे. बांगलादेशातील मंदिरे आणि देवतांचे पद्धतशीर पावित्र्यभंग केले जात आहे अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. ''ढाक्याच्या तांतीबाजार येथील पूजा मंडपावरील हल्ला आणि सातखीरा येथील जोगेश्वरी काली मंदिरातील चोरी यांची आम्ही गांभीर्याने दखल घेतली आहे,'' असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जुन्या ढाक्याच्या तांतीबाजार भागातील दुर्गापूजा मंडपात पान २ वर...

## मौलाना आझाद महामंडळ सदस्यपदी शेख तय्यब

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या शिफारशीवरून मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या अशासकीय सदस्यपदी संपादक शेख तय्यब यांची नियूक्ती करण्यात आली. या नियूक्तीनंतर शेख तय्यब यांच्या समर्थकांकडून फटाक्यांच्या आतिषबाजीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून संपादक शेख तय्यब हे ओळखले जातात. गेली कित्येक वर्षे शेख तय्यब यांनी राष्ट्रवादी व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पान २ वर...

चित्र | मुंबई-पुण्यातही ग्राहक उदासीन?

## देशभरात घरांच्या विक्रीला घरघर?

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

देशातील गृहनिर्माण क्षेत्रात गेली दोन वर्षे तेजीचे वारे होते. प्रमुख महानगरांत सातत्याने घरांच्या विक्रीत वाढ होत होती. विक्रीत वाढ होत असल्याने नवीन घरांच्या पुरवठ्यात आणि किमतीतही वाढ होत होती. पण आता मात्र देशभरात घरांच्या विक्रीला घरघर लागल्याचे समोर आले आहे. यंदा जुलै ते सप्टेंबर तिमाहीत देशातील प्रमुख सात महानगरांत १ लाख ७ हजार घरांची विक्री झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत घरांच्या विक्रीत ११ टक्के घट झाली आहे. यामुळे गृहनिर्माण क्षेत्राच्या वाढीबाबत चिंता व्यक्त होत आहे.मालमत्ता सल्लागार क्षेत्रातील अनारॉक ग्रुपने देशातील प्रमुख सात महानगरांतील घरांच्या विक्रीचा अहवाल जाहीर केला आहे. यानुसार, यंदा तिसऱ्या तिमाहीत एकूण १ लाख ७ हजार ६० घरांची विक्री झाली. गेल्या वर्षी याच कालावधीत ही विक्री १ लाख २० हजार २९० होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा घरांच्या विक्रीत ११ टक्के घट झाली आहे. सर्वच महानगरांत घरांच्या विक्रीत घट नोंदविण्यात आली आहे. याच वेळी नवीन घरांच्या पुरवठ्यातही घट झाली आहे. गेल्या वर्षी तिसऱ्या तिमाहीत नवीन घरांच्या पुरवठा १ लाख १६ हजार पान २ वर...



### मुंबई, पुण्याची आघाडी?

देशात घरांच्या विक्रीत मुंबईचा वाटा सर्वाधिक असून, त्याखालोखाल पुण्याचा क्रमांक आहे. मुंबईत ३६ हजार १९० आणि पुण्यात १९ हजार ५० घरांची विक्री झाली आहे. देशातील एकूण घरांच्या विक्रीत या दोन्ही शहरांचा वाटा तब्बल ५२ टक्के आहे. मुंबईत गेल्या वर्षी याच तिमाहीत घरांची विक्री ३८ हजार ५०५ आणि त्यात आता ६ टक्के घट झालेली आहे. याच वेळी गेल्या वर्षी तिसऱ्या तिमाहीत पुण्यात २२ हजार ८८५ घरांची विक्री झाली होती आणि त्यात आता १७ टक्के घट झाली आहे. देशातील इतर महानगरांतही घरांची विक्री घटली आहे. यंदा तिसऱ्या तिमाहीत घरांची विक्री दिल्ली १५ हजार ५७०, बंगळुरू १५ हजार २५, हैदराबाद १२ हजार ७३५, चेन्नई ४ हजार ५१० आणि कोलकता ३ हजार ९८० झाली. घरांच्या विक्रीतील घट दिल्ली २ टक्के, बंगळुरू ८ टक्के, हैदराबाद २२ टक्के, चेन्नई ९ टक्के आणि कोलकता २५ टक्के अशी आहे.

## भाजप दहशतवादी पक्ष!

राजकीय: मोदींच्या टीकेला खरगेंचे प्रत्युत्तर



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरी नक्षलवाद्यांची टोळी काँग्रेस पक्ष चालवत आहे,'' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आरोपाला उत्तर देताना पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी भाजपवर जोरदार प्रतिहल्ला केला. ''भाजप हा दहशतवाद्यांचा पक्ष आहे,'' अशी तिखट टीका खरगे यांनी शनिवारी कर्नाटकच्या कलबुर्गी येथे पत्रकारांशी बोलताना केली. भाजप हा पक्ष लोकांचे झुंडबळी घेतो, त्यांना मारहाण करतो आणि अनुसूचित जाती व जमातीच्या जनतेवर अत्याचार करतो असे आरोपही खरगेंनी केले.

काँग्रेसवर नक्षलवाद्यांचे नियंत्रण आहे अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी बुधवारी केली होती. त्याविषयी विचारले असता पान २ वर...

## प्रज्ञेचे (अ) प्रस्तुत प्राक्तन!

कृत्रिम प्रज्ञेपेक्षाही मला चिंता आहे, ती आपण नैसर्गिकरीत्या जो मूर्खपणा करतो, त्याची,' असे युवाल नोआह हरारी म्हणतो, तेव्हा त्याने गृहीत धरलेले असते, की कृत्रिम प्रज्ञेचा वापर मूर्खांच्या हाती जाऊन त्याने विधायकापेक्षा विघातकच अधिक घडेल. त्याचे म्हणणे असते, की मानवाने इतिहासात, विशेषत: नजीकच्या इतिहासात वंशवाद, असमानता, पुरुषी वर्चस्ववाद असा जो काही 'मूर्ख'पणा करून ठेवलेला आहे, त्याच विदेवर वा माहितीसाठ्याच्या आधारावर कृत्रिम प्रज्ञा पोसली जाणार असेल, तर तीही तशीच 'वागेल'. यातले दुसरे म्हणणे असेही, की हे तंत्रज्ञान माहितीची सहज मोडतोड करण्यात इतके पटाईत आहे, की अनेकांना नैसर्गिकपणे याच वापराने खुणावले, तर नवल नाही. थोडक्यात, 'कृत्रिम प्रज्ञा : शाप, की वरदान' या विषयावरील निबंध हरारीने स्वत:च्या प्रज्ञेने लिहिला, तर त्याचा झुकाव प्रामुख्याने शापाकडे असण्याची शक्यता अधिक. हरारीप्रमाणेच कृत्रिम प्रज्ञेच्या संभाव्य धोक्यांपासून सावध करणारे आणि त्या कारणासाठी गेल्या वर्षी 'गूगल'मधून बाहेर पडलेले जेफ्री हिंटन यांना सरत्या आठवड्यात त्यांच्या कृत्रिम प्रज्ञेतील कामासाठीच नोबेल पारितोषिक जाहीर झाले, तेव्हा ही चर्चा ओघानेच पुन्हा सुरू झाली.

हिंटन यांना प्रिन्स्टन विद्यापीठातील प्राध्यापक जॉन हॉपफिल्ड यांच्या जोडीने हे नोबेल पारितोषिक जाहीर झाले आहे. आधुनिक कृत्रिम प्रज्ञेचा पाया रचण्याचे क्रांतिकारी काम केल्याबद्दल या दोघांना हा सन्मान जाहीर होत असल्याचे नोबेल समितीने म्हटले. या दोघांचे कार्य काय, तर त्यांनी असे 'आर्टिफिशियल न्युरल नेटवर्क' किंवा कृत्रिम मज्जातंतू जाळे तयार केले, की जे मानवी मेंदूप्रमाणे आठवणी साठवू शकते आणि वेळ पडेल, तेव्हा ती परत आठवू शकते! इतकेच नाही, तर हे जाळे त्यांना पुरविल्या जाणाऱ्या माहितीद्वारे स्वत: शिकूही शकते. यातील हॉपफिल्ड यांना ज्या कारणासाठी गौरविण्यात आले आहे, त्याचे महत्त्व असे, की त्यांनी या कृत्रिम मज्जातंतू जाळ्यात अशा प्रकारची सहयोगी स्मृती तयार केली, की जी माहितीसाठ्यातील प्रतिमा आणि इतर काही प्रकारचे आकृतिबंध साठवूही शकेल आणि त्यांची पुनर्बांधणीही करू शकेल. म्हणजे सोपे करून सांगायचे, तर एकदा का प्रतिमा स्वरूपातील माहितीसाठा पुरवला, की त्याद्वारे वेगवेगळ्या प्रतिमा किंवा आकृतिबंध निर्माण करणे शक्य होईल. तर, हिंटन यांचा सन्मान अशासाठी, की त्यांनी कृत्रिम मज्जातंतू जाळे माहितीसाठ्याच्या वैशिष्ट्यांचा स्वतंत्रपणे शोध घेऊ शकेल, अशी पद्धत शोधून काढली. हिंटन यांनी शोधून काढलेली ही पद्धतच सध्या कृत्रिम प्रज्ञेच्या उपयोजनात मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. आता दोघांनाही हे पारितोषिक मिळाले आहे, ते भौतिकशास्त्रासाठी. पण, यावर एक प्रश्न उपस्थित होतो आहे, तो असा, की 'आर्टिफिशयल न्यूरल नेटवर्क'चा भौतिकशास्त्रातील संशोधनात प्रचंड उपयोग आहेच, पण हे जाळेच मुळात भौतिकशास्त्रातील संशोधनाचा परिणाम असेल, तर त्या परिणामातील संशोधनाला नोबेल कसे काय मिळू शकते? थोडक्यात, हे भौतिकशास्त्रावर उभ्या असलेल्या संगणकशास्त्रातील संशोधन आहे, मूलभूत भौतिकशास्त्रातील संशोधन नाही, असे टीकाकारांचे म्हणणे. अर्थात, त्याला प्रतिवादही आहेच. तो असा, की कृत्रिम प्रज्ञा विज्ञानातच परिवर्तन घडवत असताना आणि तिचा वापर कण भौतिकी, खगोल भौतिकीमधील प्रगत संशोधनात होत असताना, तिच्या शोधातील पितामहांना गौरविणे औचित्याचे. प्रचंड प्रमाणातील माहितीसाठ्याचे विश्लेषण करू शकणारे कृत्रिम मज्जातंतू जाळे अस्तित्वात येईल, असा विचारही नवे शतक सुरू होताना कुणी केला नव्हता, ते आता प्रत्यक्षात आले आहे. त्यामुळे, ऐंशीच्या दशकात त्याचा पाया रचणाऱ्यांचा गौरव खचितच योग्य, असे हिंटन आणि हॉपफिल्ड यांच्या संशोधनाला मूलभूत मानणाऱ्यांचे म्हणणे. या दोघांच्या संशोधनामुळेच आज आपण यंत्रांच्या साह्याने काही क्षणांत अचूक भाषांतर मिळवू शकतो, चेहरेपट्टी ओळखणारी यंत्रणा हजेरीपट म्हणून वापरू शकतो आणि जे 'जनरेटिव्ह एआय'चे आविष्कार मानले जातात, असे चॅटजीपीटी, जेमिनी, क्लॉड असे चॅटबॉट तर आपले रोजचे सहकारी झाले आहेत.

बाकी, हिंटन यांची माहिती गूगलवर शोधू जाता, गूगल त्यांची कृत्रिम प्रज्ञेच्या विरोधातील भूमिकेची माहिती वा बातम्या दडवून ठेवत नाही. आता ही व्यापक लोकशाही वगैरे दृष्टी आहे, की निव्वळ व्यावसायिक भूमिका, असा प्रश्न पडतो. तो प्रस्तुत, की अप्रस्तुत याचे उत्तर ज्याने-त्याने आपापल्या प्रज्ञेने मिळवावे

# ऑनलाइन गेमिंगच्या विळख्यात?

गेल्या काही दिवसांपासून समाज माध्यमांवर हिमांशू मिश्रा या जेईई परीक्षा चांगल्या गुणांनी पास झालेल्या तरुणाचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यामागचं कारणही तसंच आहे. हिमांशू हा महादेव बेटींग प आणि ऑनलाईन गेमच्या इतक्या आहारी गेला होता की वयाच्या २२ व्या वर्षी त्याच्यावर ९६ लाखांपेक्षा जास्त कर्ज झालं. त्याच्या या ऑनलाईन गेमच्या व्यसनापायी त्याच्या घरच्यांनी त्याच्याशी नातं तोडून टाकलं. त्याच्या वडिलांचं निधन झालं तर त्याला वडिलांचं अंत्यदर्शनही घेता आलं नाही. त्याच्या आईने त्याच्या या गोष्टीला कंटाळून त्याच्याशी आपलं कसलंही नातं नाही, असं जाहीर केलं आहे. 'मी रस्त्यावर मरून पडलो तरी घरचे मला बघायला येणार नाहीत' असंदेखील तो म्हणत आहे.



हिमांशूच्या प्रकरणावरून नेटिझन्समध्ये दोन गट पडले आहेत. एका गटाचे म्हणणे आहे की हिमांशू खोटंनाटं सांगून सहानुभूती मिळवून लोकांकडून पैसे उकळतो. तर काहीजण त्याच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करत आहेत. पण हे प्रकरण खोटं असो किंवा खरं, पण हा व्हिडिओ व्हायरल झाला त्याखाली ज्या अनेक टिप्प्ण्या होत्या, त्या जास्त महत्त्वाच्या आहेत. कारण त्यात आपणही अशा पद्धतीने ऑनलाइल गेमिंगमधून पैसे हरल्याचे उल्लेख होते. माझे ८० हजार गेले, १२ लाख गेले, १५ लाखांना डुबलो आहे, असं तिथं लोकानी सांगितलं आहे. यावरून हे समजतं की हिमांशूचं प्रकरण खोटं असो वा खरं पण ऑनलाईन गेमिंग, गॅम्बलिंगच्या आहारी जाऊन बरीच तरुणाई फसली चालली आहे.आज सगळ्यांकडे मोबाईल आणि इंटरनेट असतं. त्यात या ऑनलाईन गेमिंग, गॅम्बलिंगच्या जाहिरातीही झळकतात. त्या जाहिरातींमधून एखाद्या सेलिब्रिटीचा चेहरा दाखवला जातो आणि ते म्हणतात की मी ५० रु, १०० रु लावले आणि ५० हजार जिंकले, १ लाख जिंकले, १० लाख जिंकले. काही जाहिरातींमध्ये हा आकडा यापेक्षाही मोठा दाखवला जातो. म्हणजे मी सुरुवातीला १०० रु. ने खेळलो आणि एक कोटी जिंकले. तरुण पिढी अशा जाहिरातींकडे साहजिकच आकर्षली जाते. हल्ली समाज माध्यमांवरचे इतर लोकांचे चमकूपणा करणारे रील, व्हिडिओ पाहून आपलाही असाच रुबाब असावा असा विचार तरुणांच्या मनात घोळत असतो किंवा त्याचं त्यांना आकर्षण असतं. पण पुरेसे पैसे नसल्याने ते शौक पूर्ण करता येत नाहीत. मग अशा जाहिराती पाहून कमी वेळात झटपट पैसे कमवण्याचा मोह होतो.

युट्यूबवरही असे अनेक व्हिडिओज आहेत ज्यामध्ये गेमिंग चॅनल चालवणारे युट्यूबर सर्रास सांगतात की ऑनलाईन गेम खेळून मी महिन्याला इतके कमवले. त्या पैशातून लक्झरी गाडी घेतली, परदेशीच फिरलो. याची भुरळ इतर तरुणांना लगेच पडते. ते पाहून गेम डाऊनलोड करतात. किंवा कोणीतरी लिंक शेअर केली असेल तर त्या लिंकद्वारे प डाऊनलोड करतात किंवा प नसेल तर वेबसाईटद्वारे हे गेम खेळले जातात. यामध्ये नवीन वापरकर्त्यांना आकर्षित करण्यासाठी सुरुवातीला त्यांच्या गेमिंग वॅलेटमध्ये काही रक्कम वेलकम बोनस म्हणून जमा केली जाते. ती तुमच्या वॅलेटमध्ये दिसते पण ती तुम्ही काढू शकत नाही. पण तिचा वापर करून तुम्ही सुरुवातीला गेम खेळू शकता. खेळायला सुरुवात केल्यावर तुम्ही सतत जिंकत नाही. कधी ना कधी हरताच. हरणारा विचार करतो की जाऊ दे, कुठे माझे पैसे होते गेले तर गेले. आता एकदा माझे पैसे लावून खेळतो. मग त्यात एखादा गेम जिंकला की त्याच्या मनात आणखी पैसे जिंकायची लालूच निर्माण होते. मग तरुण आणखी पैसे लावून गेम खेळू लागतात. हळूहळू त्याची सवय होऊन जाते.समाज माध्यमावरील प्रसिद्ध इन्फ्लुएन्सरकडे पाहून आपलीही लाईफस्टाईल अशी असावी असा विचार अनेकांच्या मनात येतो. हे प्रसिद्ध इन्फ्लुएन्सरची गॅम्ब्लिंग, गेमिंग पची जाहिरात करतात. ती पाहून झटपट श्रीमंत होण्याच्या त्यांच्या बाता ऐकून तरुण प्रभावित होतात. तसेच हल्ली फिल्मी कलाकार, सुप्रसिद्ध खेळाडू देखील गेमिंगची जाहिरात कराना दिसतात. आपल्या देशात फिल्मी कलाकार, खेळाडू यांचे चाहते मोठ्या प्रमाणावर आहेत. यांना आदर्श, देव मानले जाते. त्यामुळे जाहिरातींवर विश्वास ठेवून तरुणपिढी या गेमकडे आकर्षित होत आहे. ग्राहक संरक्षक कायद्यानुसार सोशल मिडिया स्टार किंवा कोणत्याही सेलिब्रिटिंना ते ज्या उत्पादनाची जाहिरात करतात त्याची नैतिक जबाबदारी घेणे बंधनकारक आहे. सोशल मिडिया स्टार, कलाकार, खेळाडू सेलिब्रिटींनी या गॅम्बलिंग, गेमिंग, बेटींग पची जाहिरात करू नये असे केंद्रीय ग्राहक संरक्षक प्राधिकारणानेही बजावले आहे. पण यावर पळवट, तोडगा म्हणून गेमिंग, बेटिंग कंपन्यांनी आपल्या प्स, वेबसाईटना गेम ऑफ स्किल्स म्हणजे कौशल्यबुद्धीमतेचा खेळ म्हणून स्वत:ला प्रेझेंट केलं आहे.

## पान एक वरून

### आपला डाव खेळायचा की

पंकजा मुंडे यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. त्या म्हणाल्या की, मला गोपीनाथ मुंडे यांनी वारसा दिला. गोपीनाथ मुंडे यांचं भगवान गडावरून शेवटचं वाक्य होतं की, मला गडावरून दिल्ली आणि मुंबई नाही तर पंकजा मुंडे दिसते. त्यामधून मला त्यांनी एक संदेश दिला. मला जीवनात काही निर्माण करता आलं नाही. पण मी एक भगवान भक्तीगड उभा केला. गोपीनाथ मुंडे साहेबांनी दिलेला शब्द मी पूर्ण करून दाखवला. मला येथील जनता जास्त प्रिय आहे. माझ्यावर ज्यावेळी जीएसटीची रेड पडली होती, त्यावेळी या सर्व लोकांनी १२ कोटी रुपये जमा केले होते. माझ्या निवडणुकीचा निकाल लागला होता, तेव्हा या लोकांनी जीव दिला. येथील सर्व लोकांवर मी माझ्या लेकरांपेक्षा जास्त जीव लावते. मी कुणालाही घाबरत नाही. मी उसतोड कामगारांचे आयुष्य बदलल्याशिवाय शांत बसणार नाही, असंही पंकजा मुंडे म्हणाल्या.

### यावेळी उलथापालथ करावीच

याल. मात्र, आपण या ठिकाणी एवढ्या मोठ्या संख्येने आला आहात. या समुदायावर संस्कार आहेत. हा समुदाय कधीही मस्तीत वागला नाही. प्रत्येकाला सांभाळून घेण्याचं आणि साथ देण्याचं काम या समाजाने केलं. या समाजाने कधीही जातीवाद केला नाही. एवढं मोठं व्यासपीठ जर पुरत नसेल तर खरोखर तुमच्या समोर आज मला नतमस्तक व्हावं लागेल. एकदा जर तुम्ही साथ द्यायची ठरवलं तर तुम्ही पूर्णपणे साथ देता. मग तुम्ही हटत नाहीत. एकदा जर तुम्ही नाही म्हणाले तर मग साथ देतच नाहीत. आपण आज काही बोलणार नाही, मर्यादा पाळणार. जरी तुमची इच्छा असली बोलावं, पण मी आपल्या हिंदू धर्माची शिकवण आणि नारायण गडाची शिकवण पाळणार आहे. एकमेकांना समजून घेण्याची शिकवण आपल्याला दिलेली आहे. गडाचा आशीर्वाद ज्यांना ज्यांना मिळतो ते दिल्लीला सुद्धा झुकवतो. याआधी ज्यांना आशीर्वाद मिळाला त्यांनी दिल्लीला झुकवले. पण ते नंतर उलटले, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं.महाराष्ट्रात एक लाट आली आणि उठाव झाला. मात्र, आपल्याला यावेळी उलथापालथ करावीच लागणार आहे. या शिवाय आपल्याकडे पर्याय नाही. आपल्या नाकावर टिचून जर कुठले निर्णय होणार असतील आणि राज्यातील मराठा समाजावर अन्याय होणार असेल तर आपल्याला या समाजाच्या लेकरांसाठी आपल्याला लढावच लागणार आहे. शेवटी आपल्याला आपला समुदाय आणि शेतकरी महत्वाचा आहे. मला तुमच्याकडून एकच वचन पाहिजे. जर आपल्या राज्यातील जनतेवर अन्याय झाला आणि मी सांगितलं आपल्याल हेच करायचं तर तेच करा, हेच वजन मला आज तुम्ही द्या, असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं.

### कुटुंब उद्ध्वस्त, सरकारला

केला आहे. अनेक अपघात होऊनही सरकारने कोणताही धडा घेतला नाही. किती कुटुंबं उद्ध्वस्त झाल्यावर या सरकारला जाग येणार का?, असा हल्लाबोल राहुल गांधी यांनी केला आहे.म्हैसूर-दरभंगा ट्रेनचा अपघात बालासोरच्या भीषण बालासोरच्या भीषण अपघाताची आठवण करून देतो. एक प्रवासी ट्रेन एका थांबलेल्या मालगाडीला धडकली. अनेक अपघातात अनेकांना जीव गमवावा लागला असूनही काही धडा घेतलेला नाही. खरं तर ही जबाबदारी वरपासून सुरू होते. मात्र, या सरकारला जाग येण्यापूर्वी आणखी किती कुटुंबे उद्ध्वस्त करायची आहेत?, असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.दरम्यान, म्हैसूरहून दरभंगाला जाणारी एक्स्प्रेस तामिळनाडूतील कावराईपेट्टई रेल्वे स्थानकावर मालगाडीला धडकली. या घटनेनंतर रेल्वेच्या दोन डब्यांना आग लागली आणि काही डबे रुळावरून घसरले. या घटनेनंतर प्रवाशांमध्ये मोठी घबराट पसरली होती. मात्र, त्यानंतर घटनास्थळी तातडीने रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह स्थानिक प्रशासनाचे अधिकारी पोहोचले. त्यानंतर तातडीने प्रवाशाना मदत करण्यात आली. तसेच जखमी झालेल्या प्रवाशांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. दरम्यान, या अपघातामुळे त्या मार्गावरून धावणाऱ्या दुसऱ्या अनेक गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले होते.

### बाबा सिद्दीकी गोळीबारात

कार्यकर्ते महत्त्वाची भूमिका बजावत असतात. १९९५ च्या निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीच्या वादळात मुंबईतील काँग्रेस पक्ष भुईसपाट झाला होता. १९९९ च्या निवडणुकीत थोडी उभारी आली, त्यावेळी जे काही थोडेथोडके आमदार निवडून आले, त्यातले एक बाबा सिद्दीकी एक होते. त्याआधी १९९२ ते १९९७ या कालावधीत ते काँग्रेसचे नगरसेवक होते. अगदी लहान वयातच ते काँग्रेसमध्ये सामील झाले होते.मुंबई काँग्रेसमधील एक महत्त्वाचा नेता अशी सिद्दीकी यांची ओळख होती. त्यांचा मुलगा आमदार झिशान हा मुंबई युवक काँग्रेसचा अध्यक्ष आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी बाबा सिद्दीकी यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात जाण्याचा निर्णय घेतला होता.

### बांगलादेशात मंदिर हल्ल्यांची

शुक्रवारी रात्री गावठी बॉम्ब फेकण्यात आल्याचे वृत्त बांगलादेशातील 'प्रोथोम आलो' या वर्तमानपत्राने दिले आहे. या बॉम्बचा स्फोट झाला पण त्यामध्ये कोणीही जखमी झाले नाही. या घटनांची भारताने गंभीर दखल घेतल्याचे सांगितले आहे.दरम्यान, दुर्गापूजा सोहळ्यादरम्यान जवळपास ३५ अनुचित प्रसंग घडले असून त्या प्रकरणी १७ जणांना अटक करण्यात आली आहे आणि १०पेक्षा अधिक गुन्हे नोंदवण्यात आले आहेत अशी माहिती ढाक्याचे पोलीस महानिरीक्षक मोहम्मद मोइनुल इस्लाम यांनी 'ढाका ट्रिब्युन' या वर्तमानपत्राला दिली आहे. पूजा मंडपांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांमुळे चिंता आणि भीती आहे, अन्यथा हा सोहळा अधिक उत्साहात साजरा झाला असता असे तेथील हिंदू नागरिकांनी सांगितले. बांगलादेशात जवळपास आठ टक्के हिंदू असून त्यांची लोकंख्या जवळपास एक कोटी ३० लाख इतकी आहे. विद्यार्थी निदर्शनांनंतर शेख हसीना सत्तेवरून पायउतार होऊन भारताच्या आश्रयाला आल्या आहेत. त्यानंतर तेथे हिंदूंवर हल्ल्यांच्या काही घटना घडल्या होत्या. त्यामुळे यंदाच्या दुर्गापूजा उत्सवावर चिंता आणि भीतीचे सावट दिसून आले.पूजा मंडपावरील हल्ला, मंदिरातील चोरी या घटनांच्या पार्श्वभूमीवर हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनुस यांनी ढाक्यातील अनेक शतके जुन्या ढाकेश्वरी मंदिराला भेट दिली. आम्हाला असा बांगलादेश उभारायचा आहे जिथे प्रत्येक नागरिकाच्या अधिकाराचे रक्षण केले जाईल असे ते मंदिरातील कार्यक्रमात म्हणाले.

### मौलाना आझाद महामंडळ

वचाराशी सलग्न राहत काम केलेले आहे. ना.धनंजय मुंडे यांनी शेख तय्यब यांच्या कामाची दखल घेत त्यांना महामंडळावर काम करण्याची संधी दिली. ना.मुंडेंच्या शिफारशीवरून महाराष्ट्र शासनाच्या मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मुंबईच्या अशासकीय सदस्यपद शेख तय्यब यांना देण्यात आलं. काल महामंडळाची कार्यकारिणी जाहीर झाली, याची माहिती बीड सह जिल्हाभरात झाल्यानंतर संपादक शेख तय्यब यांच्या समर्थकांनी फटाक्यांची आतिषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला.

### देशभरात घरांच्या विक्रीला

२२० होता. यंदा तिसऱ्या तिमाहीत तो ९३ हजार ७५० वर घसरला आहे

भविष्यातील चित्र कसे? : देशातील गृहनिर्माण क्षेत्राने यंदा पहिल्या तिमाहीत उच्चांक गाठला. त्यानंतर आता गृहनिर्माण बाजारपेठ आता सामान्य पातळीवर स्थिरावू लागली आहे. घरांच्या किमती वाढल्या असून, त्याही आता स्थिरावू लागल्या आहेत. आगामी काळ सणासुदीचा आहे. या काळात भारतीय नवीन खरेदीला प्राधान्य देतात. त्यामुळे अनेक विकासक सणासुदीच्या पार्श्वभूमीवर सवलती जाहीर करून ग्राहकांना आकर्षित करतील. यामुळे पुढील काळात घरांच्या विक्रीत वाढ होण्याचा अंदाज आहे. असे असले तरी पुढील काही तिमाहींमध्ये घरांच्या विक्रीतील वाढ गेल्या दोन वर्षांएवढी नसेल. त्यामुळे घरांच्या विक्रीतील वाढीचा वेग पुढील काही काळ फारसा असणार नाही.

### भाजप दहशतवादी

खरगे म्हणाले की, ''ते नेहमीच असे बोलतात, आताही ते असेच बोलत आहे. (लोकसभा निवडणूक निकालानंतर) आतापर्यंत ते गप्प होते, (हरियाणातील विजयामुळे) थोडे चैतन्य मिळाल्यानंतर ते आम्हाला शहरी नक्षलवादी म्हणत आहेत. ते बुद्धिवादी आणि प्रगतशील लोकांना नक्षलवादी म्हणतात, ते काँग्रेसलाही शहरी नक्षलवादी म्हणतात. ती त्यांची सवय आहे.'' पुढे ते म्हणाले की, ''मोदींचा स्वत:चा पक्ष दहशतवाद्यांचा आहे. ते झुंडबळी घेतात, लोकांना मारहाण करतात, अनुसूचित जातीच्या लोकांच्या तोंडामध्ये मूत्रविसर्जन करतात, आदिवासी जनतेवर बलात्कार करतात. त्यांचा पक्ष दहशतवादी पक्ष आहे. अशी कृत्ये करणाऱ्या लोकांना ते पाठिंबा देतात, त्यानंतर ते इतरांवर टीका करतात.'' मोदी लोकांबद्दल कमी आणि पक्षाबद्दल जास्त बोलतात असेही ते म्हणाले.खरगे यांच्या टिप्पणीवर कर्नाटकातील ज्येष्ठ भाजप नेते रवीकुमार यांनी टीका केली. मोदी सरकारच्या कार्यकाळात दहशतवादी आणि नक्षलवादी घटनांमध्ये ८० ते ९० टक्के घट झाली आहे असे ते म्हणाले. केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनीही खरगेंच्या टीकेला उत्तर दिले. ''काँग्रेस पक्ष नेहमी दहशतवाद्यांनाबरोबर राहिला आहे, तेच आता आमच्यावर आरोप करत आहेत. त्यांनी स्वत:कडे पाहावे,'' असे सिंह म्हणाले.

## पान सहा वरून

### सत्ताधाऱ्यांना खुर्चीतून

नागनाथ सलगर, सौरभ सलगर यांच्यासह शेकडो जणांनी प्रवेश केला तर परळी शहरातील एकमीणार चौक तसेच वाल्मिकी नगर येथील शेख हसन, शेख इक्बाल यांच्यासह अनेकांनी तर सावता माळी आणि गणेशपार भागातील परमेश्वर ठाकरे यांच्यासह शेकडो जणांनी प्रवेश केला. याबरोबरच येळंब येथील मुलुख मैदानी तोफ संगीता होळंबे, शहरातील रेखाताई कांबळे, नागापूर येथील सतीश सोनटक्के यांचाही जाहीर प्रवेश झाला तर मलिकपुरा भागातील पठाण नोमन यांच्या नेतृत्वात ४०० कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. याच कार्यक्रमात बोलतांना युवा नेते राजेभाऊ फड म्हणाले की, पक्षात काम करीत असताना पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या जिल्ह्यातील जनतेने मागील लोकसभेला परिवर्तन घडवून आणले. त्याचप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीत जो उमेदवार पक्षाकडून दिला जाईल तोच आमदार म्हणून निवडून येणार आहे. पक्षासाठी आम्ही पूर्ण ताकदीने मैदानात उतरून काम करणार आहोत. विद्यमान पालकमंत्री यांना सभा घेऊन जनतेची माफी मागावी लागली. या मतदार संघातील अनेक कामांत कोट्यवधी रुपयांचा त्यांनी भ्रष्टाचार केला. भुयारी गटार योजना खाऊन टाकली, शेतकऱ्यांचा पिक विमा आणि अनुदान खाऊन टाकले, रस्ते विकासातील निधी हडप केला. याची आगामी काळात त्यांना परतफेड करावी लागणार आहे. पवार साहेबांनी त्यांना आमदार केले, मंत्री केले, जे जे हवे ते ते दिले मात्र त्यांनीच धोका दिला. नाद कोणाचाही करा मात्र शरद पवारांचा करू नका. पालकमंत्र्यांनी फक्त मैदानात यावे त्यांना शरद पवारांची ताकद काय असते हे दाखवल्याशिवाय राहणार नाही असा इशारा राजेभाऊ फड यांनी आपल्या भाषणातून दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहराध्यक्ष ऍड.जीवनराव देशमुख यांची उपस्थिती होती तर व्यासपीठावर ज्येष्ठ नेते अब्दुल समद, तालुकाध्यक्ष शंकर शेजुळ, ओबीसी विभाग तालुकाध्यक्ष एच. यु.फड, शहराध्यक्ष अशोकराव मुंडे, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष वर्षाताई रायभोळे, युवा नेते सोपानराव तोंडे, युवा शहराध्यक्ष सय्यद फिरोज, कार्याध्यक्ष महेबुब कुरेशी,युवती तालुकाध्यक्ष दिपाली सावंत, शहराध्यक्ष अश्विनी सरवदे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष श्रीदेवी शिंदे, शहर सचिव सविता नंदगवळी, सौ.अश्विनी सोळंके यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

### प्रा.निखिल जाधव यांना

फार्मसीमधील विविध कंपनी मध्ये नोकरीची संधी असताना मातीशी नाळ व वडीलांसारखा आपल्या ज्ञान व अनुभवाचा वापर ग्रामीण भागातील मुलांना व्हावा म्हणून गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथे प्राध्यापक म्हणुन रुजू झाले. महाविद्यालयात अध्यापन करताना, वेळ मिळेल तसे वैज्ञानिक प्रयोग करून अनेक संशोधन लेख प्रकाशित केले. आज स्वतः आणि विद्यार्थ्यांसोबत त्यांचे १५ पेक्षा अधिक रिसर्च आर्टिकल नॅशनल आणि इंटरनॅशनल जर्नल मध्ये प्रकाशित आहेत तसेच त्यांनी विविध स्टेटलेव्हल, नॅशनल आणि इंटरनॅशनल सेमिनार आणि कॉन्फरनस, महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलचे वर्कशॉप अटेंड केले आहेत. त्याचबरोबर त्यांच्या संशोधनाला भारत सरकारकडून ३ पेटंट मिळाले आहेत. गुरुकृपा इन्स्टिट्युट येथील प्राध्यापकांसमवेत त्यांचे डिप्लोमा फार्मसी मधील महत्वाच्या विषयाचे पुस्तक प्रकाशित झाले आहेत. कमी वेळेत आणि कमी वयात त्यांनी केलेल काम लक्षात घेवून अमेरिकेतील 'वर्ल्ड पिस ऑफ युनायटेड नेशन' या विद्यापीठाने कार्य गौरव करण्यासाठी जागतिक सन्मान म्हणून त्यांना डॉक्टर ही मानद उपाधी दिली आहे.

### ठेकेदाराला चक्क सहा तास वीज

कनिष्ठ अभियंता पठाण यांचेशी संपर्क साधला असता त्यांचा फोन लागला नव्हता जरंडी चे लाईनमन विकास पाटील यांचेशी संपर्क साधला असता त्या ठेकेदाराने वरीष्ठ पातळी वरून परमिट चे आदेश आणले असल्याचे सांगितले त्यामुळे त्यांना हे परमिट देण्यात आले असे सांगितले मात्र महावितरण च्या वीज मंडळाने ऐन नवरात्र मध्ये सणा सुदीच्या काळात ग्रामस्थांना वेठीस धरले वीज पुरवठा ठप्प झाल्या मुळे बँकेचे व्यवहार ठप्प झाले होते त्यामुळे बँकेच्या खातेदारांना व्यवहार करता आले नाही.

### केज तहसीलदारांची खुर्ची कायम

केज तहसीलदार यांना फोन उचलायला वेळ नाही तरी बीड जिल्ह्याचे कलेक्टर यांनी केजच्या तहसीलदारांना कलेक्टर पद द्यावे व त्यांनी तहसीलदार पदी काम करावे कारण केज तहसीलदार यांना जिल्ह्याचा कारभार बघता येईल कारण ते कलेक्टर पेक्षा कमी नाहीत कारण ते तहसीलदार असल्या सारखे वागत नाहीत तर कलेक्टर सारखे वागत आहेत त्यामुळे केज तहसीलदार साहेब असुन खोळबा नसुन ओळीबा या म्हणी प्रमाणे केज तहसीलदार यांचे काम झाले आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

### महिलांच्या कला

राजश्री धनंजय मुंडे यांनी समाजातील महिलांबरोबर दांडियाचा आनंद घेतला, स्पर्धेचे परिक्षण करणारे अनंत मुंडे,प्रा डॉ रागिणी पाध्ये, पुजा उपाध्ये, रजनी दहिफळे यांच्यासह विश्वजित मुंडे, उद्योजक विशाल आघाव, किशनराव मामडे, शुभम पुरभय्ये, शिवशंकर जठार, वैजनाथ बेंडे, कृष्णा बेंडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, माजी नगरसेविका प्राजक्ता श्रीकृष्ण कराड उपस्थित होत्या. कार्यक्रमास महाराष्ट्र प्रांतीक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, कोलूघाणा सोसायटीचे अध्यक्ष सुरेश लांडगे, बेलवाडी मंदिर ट्रस्टचे विश्वस्त शिवकुमार व्यवहारे, राजेंद्र सोनी, छगन क्षिरसागर, चंद्रशेखर फुटके, मलिकार्जुन साखरे, नागनाथ आप्पा भाग्यवंत, प्रा मधुकर शिंदे, अतुल बेंडे, शिवशंकर जठार, तेली समाज दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष युवक नेते पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, गंगाधर क्षिरसागर, गजानन बेंडे, राजकुमार भाग्यवंत, सचिन लासे, सतिष फुटके, ईश्वर राऊत, सुनील क्षिरसागर, दिपक साखरे, रवी अन्नपुर्णे, शंकर कौले, ईश्वर जठार, प्रकाश नकाते, ओंकार नाईक, प्रसाद जठार उपस्थित होते.

### धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त

केशव पांडुरंग तात्या गायकवाड ,नितीन गायकवाड, किरण गवारे, महादू गवारे, जरिचंद्र मस्के, निवृती गायकवाड, विष्णु पाचंगे, बाबुराव जाधव, वैजनाथ गायकवाड, गणपत भोसले, लहु गायकवाड, गोरक सोनकांबळे, भाऊराव सोनकांबळे, सत्यवान कांबळे, ग्यानोबा सोनकांबळे, बाबुराव कांबळे, त्रिंबक जंगले, वैजनाथ कांबळे, राजु भोसले, अमोल भोसले, किशोर जाधव, आकाश कांबळे, सुधाकर तेलंगे, बंटी कांबळे, सत्यवान कांबळे, राहुल मेत्रे, पश्मेश्वर कांबळे, आदित्य गायकवाड, वैजनाथ सोनकांबळे, राजु वाघमारे, विनायक भोसले, बाळु भोसले, वेताळ जंगले, धम्मा सोनकांबळे, राज गायकवाड आदी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अँन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# पावसाच्या माऱ्यात पिकांचे मोठे नुकसान!

## अस्मानी — चारही मंडळात अतिवृष्टीची नोंद

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहरासह तालुक्यात शुक्रवारी (ता.११) रात्री आठ वाजेपासून सुरू झालेल्या परतीच्या पावसाने शनिवारी (ता.१२)पहाटे चार वाजेपर्यंत संततधार मुसळधार पावसाने थैमान घातले होते दरम्यान आठ तासात तालुक्यात सरासरी २६५ मी मी पावसाची नोंद झाली आहे त्यामुळे खरिपाच्या पिकांची माती झाली असून कपाशी, ज्वारी,बाजरी,मका,सोयाबीन ही पिके पूर्णपणे हातून गेली आहे

शहरासह तालुक्यात शुक्रवारी रात्री पासून संततधार पावसाने थैमान घातले होते यामध्ये घोसला शिवरावर ढगफुटीचा पाऊस झाल्याने शनिवारी दुपारी एक वाजेपर्यंत खटकाळीं नदीचा पूर सुरूच होता दरम्यान कपाशीच्या पिकांची भिजून वाती झाल्या आहे मका व सोयाबीन ला कोंब फुटले आहे ज्वारी,बाजरी या पिकांची माती झाली आहे अद्यापही महसूल आणि कृषी च्या पथकांनी पाहणी केलेली नसल्याने नुकसानीची आकडेवारी मिळाली नव्हती दरम्यान अतिवृष्टी ची नोंद होवूनही शनिवारी शेतकऱ्यांच्या बांधावर एकही महसूल व कृषिचा कर्मचारी फिरकला नव्हता त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर शासनाचे नियंत्रण आहे की नाही असा संतप्त शेतकरी करत आहे दरम्यान सोयगाव मंडळात सर्वाधिक ६८ मी मी पावसाची नोंद झाली आहे या मंडळातही मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहायक शनिवारी पाहणी साठी आलेले नव्हते त्यामुळे ऐन विजया दशमीच्या दिवशी पिकांच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती संततधार पावसामुळे सोयगाव, बनोटी मंडळात सर्वाधिक नुकसान झाले आहे कपाशी पिके पाण्यात बुडाली होती घोसला येथे ढगफुटी च्या पावसाने पिके वाहून गेली दरम्यान खटकाळी नदीचा पूर रात्री आलेला पूर सकाळी अकरा वाजेपर्यंत ओसरला नव्हता



### मंडळनिहाय पाऊस

| | |
|---|---|
| सोयगाव | ६८ मी मी |
| बनोटी | ६५ मी मी |
| सावळदबारा | ६६ मी मी |
| जरंडी | ६५ मी मी |

### नांदा तांड्यात घर कोसळून एक गंभीर

दरम्यान सावळदबारा मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदा तांडा गावात कुटुंब गाढ झोपेत असताना घर अंगावर कोसळून अंकुश ज्योतिराम राठोड(वय३५) हे गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी रात्री दीड वाजेच्या सुमारास घडली आहे अतिवृष्टी च्या संततधार पावसाने ज्योतिराम महारू राठोड यांचे घराच्या दोन्ही भिंती कोसळल्या यामध्ये ऐकू राठोड हे गंभीर जखमी झाले शनिवारी तलाठी विशाल शेलकर यांनी घटनेचा पंचनामा केला आहे दरम्यान सोयगाव मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे मका सोयाबीन ज्वारी बाजरी या पिकांना कोंब फुटली आहे कापशी ओली होऊन भिजून वाती झाल्या आहेत

### नुकसानी चे तक्रार पोर्टल बंद

परतीच्या पावसाने झालेल्या नुकसानी च्या ७२ तासांच्या आत पोर्टल वर तक्रारी करण्याचे कृषी आणि महसूल विभागाने शेतकऱ्यांना सांगितले मात्र शनिवारी सकाळ पासून सदर शासनाचे पोर्टल बंद असल्याने शेतकऱ्यांना ७२ तासांच्या आत नुकसानी च्या तक्रारी करता आलेल्या नव्हत्या याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांचेशी संपर्क साधला असता सदर पीकविमा कंपनीला शनिवारी तातडीने पोर्टल सुरू करण्यात यावे यासाठी लेखी सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले आहे

# बलभीम नगर बुद्ध विहारात धम्मचक्र दिन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजी नगर पालवन रोड बीड येथे १२ ऑक्टोबर २०२४ रोजी अशोक विजयादशमी व ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त ऍड तेजस वडमारे यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनाचा कार्यक्रम आयोजीत केला होता या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थीती म्हणून बीड नगर परिषदेचे नगरसेवक विनोदजी मुळूक हजर होते त्यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर तथागत गौतम बुद्ध यांना वंदन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून सामूहिक त्रिसरण पंचशील बुद्ध वंदना व डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दीलेल्या २२ प्रतिज्ञाचे सामुहिक पठण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाअभिवादन केले व बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथ वाचच्या ८४ व्या दिवशी आयु. अंजली विशाल वडमारे हिने वाचन केले,

त्यावेळी बलभीम नगर मित्र नगर शिवाजीनगर परिसरातील सर्व बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांनी बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनाचे श्रवण केले तेव्हा आयु.निवृती वाघमारे,नीतीन वाघमारे, अमर वडमारे, अंकुश जाधव,सिद्धार्थ वडमारे, आर्यन साळवे, जय जाधव, प्रेम जोगदंड, नागेश साळवे, अजय जाधव, सचिन खेमाडे आकाश वाघमारे, आयु. आशाबाई खेमाडे, स्वाती वडमारे, कोमल वाघमारे शकुंतला ससाने मॅडम, हौसाबाई वाघमारे सरिता खेमाडे, संघर्ष वाघमारे ऍड तेजस वडमारे व परिसरातील बौद्ध उपासक उपसिका बालक बालिका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून बलभीम नगर बुद्ध विहार पलवन रोड, बीड येथे उपस्थित होते.

# साथीच्या आजारावर मोफत शिबीर

## दिलासा: जयदत्त क्षीरसागर यांची संकल्पन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रतिनिधी लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू–नाना प्रतिष्ठान, आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित महात्मा गांधी रुग्णालय व राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत उपमुख्यमंत्री (गृह /विधी व न्याय)मंत्रालय मुंबई. यांच्या समन्वयातून दि.१० ऑक्टोबर २०२४ रोजी बीड तालुक्यातील नागझरी येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.



हवामानाच्या बदलामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्या विषयी समस्या उद्भवत असून प्रामुख्याने सर्दी,ताप,खोकला,हाडांचे आजार, मणक्याचे आजार, संधिवात तसेच संसर्गजन्य रोग याबाबत तक्रारी निदर्शनास आल्या. या सामुदायिक आरोग्य कॅम्पच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे मोफत तपासणी करून ई.सी.जी., रक्त तपासण्या करून औषधोपचार केला जातो. या समाज उपयोगी शिबीरामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळत असल्याचे दिसून येत आहे. काकू–नाना प्रतिष्ठानचे डॉ. अरुण भस्मे, प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार, समन्वयक डॉ.अंजली क्षीरसागर, डॉ.अमृता आगवान, डॉ. श्रेयस ढाकणे, डॉ.विश्वजीत बोंडार, डॉ.आनंद दाभाडे, डॉ.योगेश धुमक यांच्या परिश्रमाने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर यशस्वी झाले.



बीड : बारामती येथे विजयादशमीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी युवा नेते पार्थ अजित पवार यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

# बंकटस्वामी महाविद्यालयाचे यश

## स्पर्धा : संशोधन प्रकल्प अविष्कार स्पर्धेत प्रथम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिनांक ११ऑक्टोबर २०२४ रोजी येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे अवर्षण प्रवण क्षेत्रामध्ये जलसंचयन समस्या आणि शाश्वत सांडपाणी व्यवस्थापन एक भू अभिक्षेत्रिय विश्लेषण विशेष संदर्भ बीड शहर या विषयावर करण्यात आलेल्या संशोधन प्रकल्पास पदवी मानवविद्या शाखेतून प्रथम क्रमांक मिळाला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यावतीने बीड जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन येथील सौ. के.एस.के महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. सदरील स्पर्धा ही ग्रामीण तथा शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये संशोधन आणि नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर करण्याची संधी मिळते यामधून सामाजिक गरजा आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी आयोजित करण्यात येते. सदरील स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या संशोधन प्रकल्पामध्ये अलीकडेच बीड शहरांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्ते आणि काही भाग जलमय झाला होता त्या समस्येवर व



सार्वजनिक सांडपाणी व्यवस्थेच्या संदर्भात रियल टाईम डेटा वापरून प्रत्यक्ष बीड शहरातील भूउतार काढण्यात आला व त्यानुसार इथल्या सांडपाणीचे व्यवस्था कशा पद्धतीची आहे याचा अभ्यास करून विकसित भारत तसेच शाश्वत विकास उद्दिष्टे यानुसार शाश्वत सांडपाणी व्यवस्था कशा पद्धतीची असावी यासंदर्भात पोस्टर आणि मॉडेल च्या माध्यमातून संशोधनाचे सादरीकरण करण्यात आले होते. सदर प्रकल्पाचे सादरीकरण कुमारी कीर्ती भैरवनाथ भोसले या विद्यार्थिनींनी केले होते यासाठी महाविद्यालयाचे भूगोल विभागातील सहयोगी प्राध्यापक अविष्कार सेलचे समन्वयक डॉ. प्रकाश राजेशाम कोंका यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल दोघांचेही महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.विवेक रामराव मिरगणे तथा उपप्राचार्य व उपप्राचार्य व विभाग प्रमुख डॉ. शिवाजी मोरे यांनी सत्कार करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या याप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी प्राध्यापक शिक्षक उपस्थित होते.



### श्रीकृष्ण महाराज उबाळे यांचे प्रवचन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड येथील स्वराज्य नगर मधील ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह भ प माधव महाराज डाके काठवडेकर यांच्या माऊली निवासस्थानी दरवर्षी चातुर्मास् उत्सवानिमित्त दर सोमवारी ग्रंथराज ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा आयोजित केली जाते. सोमवार दि. १४/१०/२४ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प श्रीकृष्ण उबाळे महाराज बीड, यांची प्रवचन सेवा होणार आहे तरी सर्व भाविक भक्तांनी या प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा

# ऑनलाईन व्यवहार करतांना सावधान

## अॅड.चैतन्य भंडारी:बीडमध्ये वकील संघाकडून व्याख्यान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या बहुतांश व्यवहार ऑनलाईन पद्धतीने होत आहेत. याबरोबरच समाजमाध्यमांमधून देखील आपला अनेकांशी संपर्क येत असतो. अशा वेळी सावधानता बाळगणे गरजेचे आहे. ती बाळगली नाही तर फ सवणूक होऊ शकते असे प्रतिपादन धुळे येथील सायबर तज्ञ अॅड.चैतन्य भंडारी यांनी केले.

बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने अॅड.चैतन्य भंडारी यांच्या सायबर विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर, वकील संघाचे अध्यक्ष अॅड.रोहिदास येवले, उपाध्यक्ष अॅड.नितीन वाघमारे, अॅड.अविनाश गडगे सचिव, यासेर पटेल यांची उपस्थिती होती. सध्या



सोशल मीडिया व्हाट्सअप, फेसबुक ,इंस्टाग्राम, फोन, मेसेज करून आपल्या कळत नकळत आपले बँक खात्यावरून पैसे मोठ्या प्रमाणावर रक्कम फ्रॉड करून सायबर भामटे वर्ग करून घेत आहे. तसेच अश्लिल फोटो, व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन सेक्सटॉर्शन करणे, पैसे उकळणे, वगैरे गुन्हे समाजात घडत असतात.हे गुन्हेगार दृश्य स्वरूपात समोर नसतात परंतु कार्यरत असतात या सर्वाबाबत अॅड.भंडारी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुरवातीला प्रमुख पाहुणे यांचे स्वागत करण्यात आले, त्यानंतर वकील संघाचे अध्यक्ष अॅड. रोहिदास येवले यांनी प्रास्ताविक करून विधिज्ञांसाठी सायबर गुन्हे व सुरक्षा यावर मार्गदर्शन आवश्यक असल्याने हा कार्यक्रम घेत असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे अॅड. चैतन्य भंडारी यांची ओळख अॅड. रतिलाल भंडारी यांनी उपस्थित सदस्यांना करून दिली,

कार्यक्रमास सहसचिव अॅड. श्रीकांत जाधव, कोषाध्यक्ष धनंजय गिराम, ग्रंथपाल सचिव भीमा जगताप, वकील संघाचे अनेक जेष्ठ सदस्य, नवोदित विधिज्ञ, महीला विधिज्ञ, लॉ कॉलेजचे विद्यार्थी,उपस्थित होते. शेवटी आभार प्रदर्शन महिला प्रतिनिधी अॅड. छाया वाघमारे यांनी मानले.सदरील कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अॅड. किर्ती कुलकर्णी यांनी केले.

## सुरेंद्र थोरात — नागरी सत्कार ऐतिहासिक ठरणार

# राहुरीत नागरी सत्काराचे आयोजन

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले यांची केंद्रीयमंत्री पदी निवड झाल्या बद्दल राहुरी येथे भव्यदिव्य असे जाहीर नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रिपाइंचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष सुरेंद्रभाऊ थोरात यांनी पत्रकार परिषदेत दिली

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ना रामदासजी आठवले हे नगर जिल्ह्यात येत असुन जिल्ह्यातील मतदारसंघातचा आढावा या दौऱ्यात घेणार आहेत नगर जिल्ह्यातील रिपाइंचे पदाधिकारी हे श्रीरामपूर राखीव मतदार संघासाठी आग्रह आहेत या पार्श्वभूमीवर हा दौरा महत्वपूर्ण ठरणार आहे नागरी सत्कार समारंभाचा कार्यक्रमासाठी राज्यांचे महसूलमंत्री तथा



जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे–पाटील व जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले साहेब हे प्रमुख उपस्थितीत राहणार आहे

रिपाइंचे जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव राज्य उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड राज्य सचिव राजाभाऊ कापसे उत्तर महाराष्ट्र सचिव प्रविण लोखंडे विभागीय विभागीय प्रमुख भिमराज बागुल आदी प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत पत्रकार परिषदेला उत्तर नगर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र भाऊ थोरात राहुरी तालुका अध्यक्ष विलास नाना साळवे गोविंद दिवे शिरीष गायकवाड राहुरी तालुका उपाध्यक्ष सुनील चांदणे सिध्दांत सगळगिळे आदी उपस्थित होते

### सुरेंद्रभाऊ थोरात साठी समाज आग्रही !

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर मतदार संघ राखीव असून या मतदारसंघ रिपाइ ला मिळवण्यासाठी समाजातून मोठ्या दबाव येत असून सर्व समाज बांधव एकवटले आहेत श्रीरामपूर मतदारसंघ हा कुठल्याही परिस्थितीत रिपाइंला सोडवा व त्या ठिकाणाहून रिपाइंचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र भाऊ थोरात यांनी उमेदवारी करावी अशी आग्रही मागणी मतदारसंघांतील सर्व पक्षीय पदाधिकारी व समाजातुन होत आहे

# लाडक्या बहिणींना पुन्हा मुद्दवाढ

## योजना: सोयगाव तालुक्यात पहिल्याच दिवशी अर्ज

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

लाडकी बहीण योजनेसाठी वंचित राहिलेल्या महिलांना पुन्हा गुरुवारी रात्री बारा वाजेपासून अर्ज करता येणार आहे रविवारी( दि.१३) पर्यंत शासनाने ही मुदतवाढ देऊन लाडकी बहीण योजनेचा पोर्टल सुरू केले आहे त्यामुळे पुन्हा वय २१ ते ६५ वर्ष वय असलेल्या महिलांना दोन दिवस अर्ज करण्यासाठी संधी मिळाली आहे त्यामुळे शुक्रवारी सोयगाव तालुका समितीच्या पोर्टल वर २५ नवीन अर्ज प्राप्त झाले आहे

तीस सप्टेंबर नंतर ही मुदत संपली होती सोयगाव तालुक्यात २६ हजार लाडक्या बहिणींना या योजनेचे साडेसात हजार



रु याप्रमाणे रक्कम प्राप्त झाली आहे मात्र तीस सप्टेंबर नंतर एकही अर्ज ऑनलाइन झाला नव्हता मात्र गुरुवारी रात्री बारा वाजेपासून पुन्हा अर्ज करण्याची संधी मिळाली आहे त्यामुळे वंचित महिलाना आता (दि १३)पर्यंत अर्ज करता येणार आहे.

लाडकी बहीण योजनेचा अर्ज आता फक्त अंगणवाडी सेविकाच भरू शकणार आहे बाहेरून पोर्टल वर भरलेला अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही त्यामुळे आता पोर्टल चे लॉगिन केवळ अंगणवाडी सेविकेचे सुरू करण्यात आले आहे असे प्रकल्प अधिकारी दीपक म्हेत्रे यांनी सांगितले आहे.

**सुविचार-** तुम्हाला तुमच्या आवडीचे काम मिळालेले नसले तरी मिळालेले काम आवडीने करा.

## हा हट्ट कशासाठी........?

जवळपास महिना-दीड महिन्यांपूर्वी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांची संयुक्त सभा मुंबईला झाली होती. त्या सभेत उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीने मुख्यमंत्री पदाचा चेहरा आधी घोषित करावा अशी मागणी केली. हा चेहरा कोणाचाही असो त्याला आपला पाठिंबा असेल, असेही त्यांनी म्हटले होते. काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस मुख्यमंत्री पदाचा चेहरा निवडणुकीपूर्वी घोषित करू शकत नाही याची जाणीव उद्धव ठाकरे यांना नक्कीच होती किंवा आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा पुढे करायचा तर आपल्याशिवाय दुसरा पर्याय नाही हेदेखील त्यांना चांगले ठाऊक आहे. कदाचित त्यामुळेच विविध तर्क देत त्यांनी निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा महाविकास आघाडीने घोषित करावा, अशी मागणी लावून धरली असेल; परंतु त्यावेळी आणि नंतरही काँग्रेस किंवा शरद पवारांनी उद्धव ठाकरेंच्या या मागणीला कोणताही प्रतिसाद दिला नाही. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसची कामगिरी अपेक्षेपेक्षा चांगली झाल्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपात काँग्रेसने आपला वरचष्मा ठेवण्याचा प्रयत्न केला. अगदी काल-परवापर्यंत काँग्रेस महाआघाडीत आपणच मोठे भाऊ या भूमिकेत वावरत होती. मुख्यमंत्री पदाचा चेहरा निवडणुकीपूर्वी घोषित करण्याची उद्धव ठाकरेंची मागणी तर काँग्रेसने सरळ सरळ उडवून लावली, शिवाय आघाडीत ज्या पक्षाचे आमदार अधिक त्या पक्षाचा मुख्यमंत्री हे सूत्र कायम राहील, असेही स्पष्ट केले. हे स्पष्टीकरण शरद पवार यांनीदेखील या आधीच दिले होते. दरम्यान, जम्मू-काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या. जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स या दोन पक्षांच्या आघाडीला बहुमत प्राप्त झाले. अर्थात त्यात नॅशनल कॉन्फरन्सचा वाटा खूप मोठा आहे. काँग्रेसच्या केवळ सहा जागा निवडून आल्या. दुसरीकडे हरियाणामध्ये सत्ता प्राप्त होणारच हा अतिआत्मविश्वास काँग्रेसला नडला आणि भाजपने काँग्रेसवर बाजी उलटवली. हा पराभव काँग्रेससाठी जितका धक्कादायक होता तितकाच काँग्रेसच्या सहकारी पक्षांसाठी वेगळ्या अर्थाने उत्साहवर्धक होता. भाजपला स्वबळावर पराभूत करण्याची क्षमता काँग्रेसमध्ये नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाल्याचे मत काँग्रेस आघाडीतील इतर नेत्यांनी व्यक्त केले. अप्रत्यक्षरित्या त्यांनी काँग्रेसने सहकारी पक्षांचा योग्य तो सन्मान करावा म्हणजेच सहकारी पक्ष म्हणतील त्या गोष्टी मान्य कराव्या असेच सुचविले आहे. या पुढच्या काळात महाराष्ट्र, झारखंड आणि दिल्लीत विधानसभा निवडणुका होणार आहेत. दिल्लीमध्ये आम आदमी पक्षाने आतापासूनच स्वतंत्रपणे लढण्याची तयारी सुरू केली आहे; परंतु महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये काँग्रेसला सहकारी पक्षांसोबत आघाडी करून लढावे लागणार आहे. त्यातही महाराष्ट्रात काँग्रेसची खरी परीक्षा आहे. झारखंडमध्ये काँग्रेस दुय्यम भूमिकेत आहेत; परंतु महाराष्ट्रात तसे नाही. लोकसभा निवडणुकीतील यशानंतर महाराष्ट्रातील काँग्रेस नेते बरेच आक्रमक झाले होते; परंतु हरियाणाच्या निवडणुकीनंतर परिस्थिती बदलली आहे. आता काँग्रेसच्या मित्र पक्षांना आता बोलायची संधी मिळाली आहे. भाजपला सत्तेपासून दूर ठेवायचे असेल तर काँग्रेसला आपल्या सहकारी पक्षांची मदत घ्यावीच लागेल आणि ती मदत घेताना सहकारी पक्षांना योग्य वाटा, सन्मान द्यावा लागेल ही भूमिका आता अप्रत्यक्षरित्या महाराष्ट्रातील काँग्रेसच्या सहकारी पक्षांकडून पुढे केली जात आहे. त्यामुळेच उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदाचा चेहरा महाविकास आघाडीने आधी जाहीर करावा अशी मागणी केली आहे. अर्थात काँग्रेसचे हात कितीही दगडाखाली असले तरी ही मागणी मान्य होणार नाही. मुख्यमंत्री पदाचा उमेदवार म्हणून कोण्याही एकाचे नाव घोषित करणे काँग्रेसला शक्य नाही आणि काँग्रेसमध्ये ती परंपरादेखील नाही. निवडणुकीनंतर पक्षश्रेष्ठी ठरवतील तोच नेता मुख्यमंत्रिपदी विराजमान होईल हीच काँग्रेसची पद्धत आहे. आत्ताच मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करण्याऐवजी थोडे थांबून निवडणूक निकालानंतर जर हुकमाचा पत्ता हातात आला तर 'पहिली महिला मुख्यमंत्री' म्हणून सुप्रियाताईंचे नाव रेटता येईल, असा सोयीस्कर विचार शरद पवार करत असतील तर तेदेखील मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करण्याची मागणी मान्य करणार नाही. अशी सगळी परिस्थिती पाहता निवडणुकीनंतर आपले काय होऊ शकते याची कल्पना आल्यामुळेच उद्धव ठाकरे सातत्याने निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणजे त्यांचा चेहरा मुख्यमंत्री म्हणून समोर करावा अशी मागणी करीत असल्याचे दिसते; परंतु ही मागणी कदापिही मान्य होणार नाही हेदेखील तितकेच निश्चित.

## एक अनार......!

लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत विधानसभा निवडणुकीचा आवाका छोटा असतो. एका लोकसभा मतदारसंघात साधारण सहा विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो, त्यामुळे लोकसभा निवडणुकीत उमेदवारीसाठी फारशी मारामारी होताना दिसत नाही. अर्थात स्पर्धा, शह-काटशह, रुसवे, फुगवे, बंडखोरी या सगळ्या गोष्टी लोकसभेची उमेदवारी मिळवताना होतातच; परंतु विधानसभेच्या तुलनेत त्यांचे प्रमाण कमी असते. यावेळी तर महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक खूपच रंगतदार होणार आहे. मागच्यावेळी जे एकमेकांच्या विरोधात लढले ते यावेळी एकमेकांच्या गळ्यात गळा घालताना दिसत आहेत. बरे ते कायमचे मित्र झाले आहेत असेही ठामपणे म्हणता येत नाही किंवा जे विरोधात आहेत ते पुढे एकत्र येणार नाहीत याचीही खात्री नाही. त्यामुळे जवळपास प्रत्येक मतदारसंघात एक वेगळीच चुरस पाहायला मिळत आहे. यावेळी प्रथमच आमदारकीसाठी गुडघ्याला बाशिंग बांधून असलेल्यांना अनेक पर्याय उपलब्ध आहेत. शेवटी कोणत्याही पक्षासाठी उमेदवारी देताना निवडून येण्याची क्षमता हाच एकमेव निकष ठरत असल्यामुळे दुसऱ्या पक्षातील अशी क्षमता असणारा नेता आपल्याकडे येत असेल तर आपल्या पक्षातील इच्छुकांना बाजूला सारण्याचे प्रकार विविध राजकीय पक्षांमध्ये सुरू झाले आहेत. इंदापूरमध्ये शरद पवार गटाकडे तगडा उमेदवार नव्हता, तर गेल्या पाच वर्षांपासून निवडणुकीची तयारी करत असलेल्या हर्षवर्धन पाटलांना हा मतदारसंघ अजित पवार गटाच्या वाटेला जात असल्यामुळे भाजपकडून लढण्याची संधी मिळणार नव्हती. त्यामुळे त्यांनी शरद पवार गटात सामील होण्याचा निर्णय घेतला. ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्षात आलेल्या हर्षवर्धन पाटलांना शरद पवार गटातील स्थानिक नेत्यांनी विरोध सुरू केला. आम्ही इतकी वर्ष प्रामाणिकपणे काम केले आणि आता ऐनवेळी बाहेरून आलेल्या नेत्याला उमेदवारी कशी दिली जात आहे हा त्यांचा रास्त प्रश्न आहे आणि हा प्रश्न प्रतिनिधीक स्वरूपाचा आहे. जवळपास प्रत्येक मतदारसंघात आणि प्रत्येक पक्षात असा प्रश्न उपस्थित करणारे कार्यकर्ते यावेळी दिसून येत आहेत. त्यामुळे या निवडणुकीत जसे घाऊक पक्षांतर दिसून येणार आहे तसेच जवळपास प्रत्येक मतदारसंघात एक तरी तगडा बंडखोर उमेदवार रिंगणात असणार आहे. या बंडखोर आणि अपक्षांच्या उपस्थितीने निवडणुकीचे निकाल कसे पलटतात त्याचे ताजे उदाहरण हरियाणामध्ये पाहायला मिळाले आहे.

### चौफेर

## नाना पटोलेंना लागले मुख्यमंत्रिपदाचे डोहाळे




**आनंद आंबेकर**
9850388613
कार्यकारी संपादक, देशोन्नती


काही दिवसांपूर्वी नागपुरात काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा मेळावा झाला. महाराष्ट्र प्रभारी चेन्नीथला या मेळाव्याला होते. मेळाव्यात नागपुरातील काँग्रेसच्या दोन-तीन वरिष्ठ नेत्यांनी एक वेगळाच राग आवळला. म्हणे, नाना पटोले हे आमचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार आहेत. या मेळाव्यातून नव्या चर्चेला उधाण आले. नाना पटोले यांचे नाव मुख्यमंत्री म्हणून प्रोजेक्ट करण्यात ही मंडळी यशस्वी झाली खरी, पण ही खेळी काँग्रेसमधील अन्य नेत्यांना किती रुचली, हा एक मोठा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला.

नाना पटोले हे भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील काँग्रेस पक्षातील मोठे नाव. भंडारा-गोंदिया जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या साकोली तालुक्यातील सुकडी नावाच्या गावातून आपल्या कर्तृत्वावर उदयास आलेले हे नेतृत्व. 'मास लीडर' म्हणून या नावाची ख्याती. म्हणे, जेव्हा नाना पटोले उमेदवारी अर्ज भरायला जायचे, तेव्हा घरोघरी त्यांचे औक्षण व्हायचे. यंत्रणेच्या विरोधात भूमिका घेणे, फाडकन् बोलणे, शेतकरी अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे हा त्यांचा मूळ स्वभाव. याच कारणामुळे त्यांनी काँग्रेसचे आमदार असताना धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून राजीनामा दिला होता. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातून लोकसभा निवडणूक अपक्ष लढण्याची हिंमत दाखविली. पराभव झाला, पण हिंमत महत्त्वाची होती.

यानंतर त्यांना काय दुर्बुद्धी सुचली कोण जाणे, भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. या निर्णयामुळे मात्र पटोलेंच्या 'इमेज'ला काहीसा धक्का लागला. भाजपचे खासदार म्हणून त्यांची नवी ओळख झाली खरी; पण काँग्रेसी विचारांचा हा माणूस जास्त दिवस त्या पक्षात टिकला नाही. पक्षातील खासदारांना पंतप्रधान मोदी बोलूच देत नाहीत, हा साक्षात्कारही त्यांना झाला आणि त्यांनी खासदारकीचा राजीनामा देत ऐन गुजरात निवडणुकीच्या काळात राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पटोलेंचा हाच निर्णय राहुल गांधी यांचा विश्वास जिंकण्यास कारणीभूत ठरला. मोदी यांच्याविरोधात आवाज उठविणारा सत्तापक्षातील पहिला खासदार म्हणून पटोले राहुल गांधींच्या 'गुड बुक'मध्ये गेले. मोठी जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. सन २०१९ मध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार आले तेव्हा त्यांना विधानसभा अध्यक्षपदाचे गिफ्ट मिळाले. त्यानंतर काही महिन्यातच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष ही जबाबदारी देत राहुल गांधी यांनी त्यांच्यावर मोठा विश्वास टाकला.

यादरम्यान, त्यांनी २०१९ मध्ये नागपुरातून भाजपचे वरिष्ठ नेते नितीन गडकरी यांच्याविरोधात निवडणूक लढविण्याची हिंमत केली. 'माझा विजय झाला नाही तर राजकारण सोडेन', अशी पोकळ घोषणा करून आणि पराभव झाल्यानंतरही साकोलीतून विधानसभा निवडणूक लढवून स्वतःचे हसे करवून घेतले होते. राजकारणात अशा घोषणा क्षम्य असतात, असे स्पष्टीकरणही पटोलेंनी दिले होते.

पटोलेंच्या या इतिहासाची उजळणी करण्यामागचे तात्पर्य एकच की, पटोले आता २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार होत आहेत. नागपुरात काँग्रेसचे नागपूर शहर अध्यक्ष आमदार विकास ठाकरे, प्रवक्ते अतुल लोंढे यांनी प्रत्यक्षपणे तर आमदार डॉ. नितीन राऊत यांनी अप्रत्यक्षपणे नाना पटोले यांच्या नावाची घोषणा करून काँग्रेसमधील वरिष्ठ नेत्यांची नाराजी ओढावून घेतली. या घोषणेने महाविकास आघाडीत मिठाचा खडा पडला तो वेगळा.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आजपर्यंत या विषयावर प्रतिक्रिया दिली नव्हती. मात्र, काल काही वृत्तवाहिनींच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांवर उत्तर दिले तेव्हा त्यांच्यातील सुप्त इच्छा समोर आली. 'हायकमांडने आदेश दिल्यास ती जबाबदारीही पार पाडू' असे उत्तर देत त्यांनी काँग्रेसमधील मुख्यमंत्रिपदाच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

मुख्यमंत्रिपदासाठी कोणाचे नाव पुढे आले, हा विषय नाही. विषय हा आहे की पटोले हे नाव पक्षातील कोणा-कोणाला रुचले? काँग्रेस हा पक्ष नव्हे, विचार आहे. इथे स्वतःची मर्जी चालत नाही. इथे कोणी आमदार किंवा पदाधिकारी निर्णय घेत नाही, तर या पक्षात निर्णय घेणारी एक स्वतंत्र यंत्रणा आहे. सध्या विधानसभा निवडणुकीची लगबग सुरू आहे. या काळात पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांची जबाबदारी मोठी असते. राज्यात पक्ष विजयी व्हावा यासाठी उमेदवारांची चाचपणी, त्यांच्या मुलाखती, दुसऱ्या पक्षातील नाराज नेत्यांच्या भेटीगाठी, पक्ष मजबुतीसाठी प्रयत्न, पक्षातील नेत्यांशी संवाद, घटक पक्षातील नेत्यांशी समन्वय, उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्यांची मते जाणून घेणे, प्रत्येकाला ऐकणे आणि पक्षहिताच्या दृष्टीने वक्तव्य करणे या जबाबदाऱ्या प्रदेशाध्यक्षाने पार पाडायच्या असतात. मात्र, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे सध्या स्वतःचीच फिल्डिंग लावण्यात व्यस्त आहेत. एखाद्या जिल्ह्याच्या ठिकाणी आमदारकीचे उमेदवार समर्थकांसह येऊन जशी घोषणाबाजी करतात, तसेच काहीसे चित्र नागपुरातील मेळाव्यात दिसले. प्रदेशाध्यक्ष म्हणून नाना पटोले किती यशस्वी ठरले हे त्यांनाच ठाऊक; मात्र इतर नेत्यांसोबत समन्वयाचा अभाव आहे, हे त्यांच्याच पक्षातील नेते दबक्या आवाजात बोलत आहेत. पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात यांच्यासारख्या वरिष्ठ नेत्यांची मते विचारात न घेता पटोले अनेक निर्णय परस्पर घेतात, असा आरोप त्यांच्यावर आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष माध्यमांसाठी केव्हाही उपलब्ध असतात. काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा फोन सतत 'नॉट रिचेबल' असतो. उमेदवारीची आशा घेऊन पटोले यांना दूरवरून भेटण्यासाठी येणाऱ्या व्यक्तीला नाराज होऊन परतावे लागते, कारण सध्या नाना पटोले यांच्या प्रायोरिटीज वेगळ्या आहेत. कोणाला तिकिट द्यायचे हे त्यांचे त्यांचे अगोदरच ठरले आहे. जो नाना पटोलेंना मुख्यमंत्रिपदासाठी प्रोजेक्ट करेल, त्यांचे तिकिट पक्के आहे. पक्षातील एक महिला खासदार जातीच्या उमेदवारांना निवडून आणा, मग तो कुठल्याही पक्षाचा असला तरी चालेल, असे वक्तव्य करतात मात्र त्यांना समज दिल्या जात नाही, त्याच महिला खासदाराविरोधात जातीवादाचा मुद्दा समोर करून चंद्रपूर जिल्ह्यात महिला काँग्रेसची जिल्हाध्यक्ष राजीनामा देते, ही बाब गांभीर्याने घेतल्या जात नाही. तिच महिला खासदार विरोधी पक्ष नेत्याच्या मतदारसंघात जाऊन त्यांच्याविरुद्ध बोलते, याकडेही गांभीर्याने बघितल्या जात नाही, हे चांगल्या प्रदेशाध्यक्षांचे लक्षण नाही. २०१४ पूर्वीचे आमदार नाना पटोले आणि आताचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. तेव्हाचे नाना लोकांचे हक्काचे होते. आताचे नाना कार्यकर्त्यांच्याही हक्काचे नाही. ते चापलूसांच्या मर्जीतील आहे. नानांनी आता जर भूमिका बदलली नाही; नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यातील संवाद वाढविला नाही तर विधानसभा हातची जाईल आणि मुख्यमंत्रिपदाचे स्वप्न स्वप्नच राहील, हे वेगळे सांगायला नको.

नाना, लोकं तुम्हाला फिटवायला निघाली आहेत. वेळीच सावध व्हा, एवढेच.

### वास्तव

## भारत-मालदीव संबंधातील चढ-उतार




**प्रा. डॉ. विनोद गायकवाड**
9850324202
राजकीय अभ्यासक


मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू यांनी नुकताच भारत दौरा केला. गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही देशातील तणावपूर्ण असलेले संबंध सुरळीत होण्यास या दौऱ्याने हातभार लागेल. भारत-मालदीव संबंध जुने असून भारत मालदीवचा सर्वात जवळचा आणि सुरुवातीपासून मित्र आहे. १९८५ मध्ये स्थापन झालेल्या सार्क संघटनेचा मालदीव संस्थापक सदस्य असल्याने भारत-मालदीव संबंध सलोख्याचे राहिलेत. मालदीवमधील राजकीय अस्थिरतेच्या काळात भारताने महत्त्वाची भूमिका पार पाडली.

१९६५ मध्ये मालदीवला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशासोबत राजनयिक संबंध प्रस्थापित करणारा भारत पहिला देश होता. या दोन्ही देशांमध्ये राजनयिक संबंधांची औपचारिक सुरुवात १९७० पासून झाली. मालदीव १९८२ मध्ये राष्ट्रकुल संघटनेत सहभागी झाला. पर्यावरण, दहशतवादाचे उच्चाटन, निशस्त्रीकरण, संरक्षण, मानवाधिकारांचे संरक्षण व संवर्धनासंबंधीच्या करारांमध्ये मालदीव सहभागी आहे. भारताने सर्वच क्षेत्रात मालदीवला भरीव मदत केली.

पायाभूत विकासासाठी भारताने मालदीवला सुरुवातीपासूनच सातत्यपूर्ण मदत केली. १९८६ मध्ये मेडिकल कॉम्प्लेक्सच्या निर्मितीसाठी भारताने ४२५ दशलक्ष रुपयाची आर्थिक मदत दिली. माले येथे इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल अत्याधुनिक दर्जाच्या सोयी-सुविधा युक्त आहे. या हॉस्पिटलच्या दुरुस्तीसाठी २०११ मध्ये ३७२.४ दशलक्ष रुपयांची मालदीवला भरीव मदत केली. त्यानंतर १९९६ मध्ये अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा माले येथे स्थापन केली. २००० मध्ये सुरक्षितता व आरोग्य याबाबत दोन्ही देशात करार झाला.

१९८८ मध्ये मालदीवला अस्थिर करण्याचा प्रयत्न झाला. पिपल्स लिबरेशन ऑर्गनायझेशन ऑफ तामिळ ईलम (प्लोटे) या संघटनेने सैनिकी मोहीम आखून अब्दुल्ला लुतुफी यांनी आपल्या सहयोगी ८० बंदूकदारांच्या मदतीने अस्थिरता निर्माण केल्याने मालदीव सरकार अडचणीत आले होते. मालदीव सरकारने भारत सरकारला लष्करी मदतीची मागणी केल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी १६०० सैनिकांची कुमक मालदीवला पाठविली. लुतुफी मोहीम मोडून काढण्यात भारतीय लष्करातील ब्रिगेडियर एफएफसी बलसारा यांनी भारतीय सैन्यांसह महत्त्वाची कामगिरी करून निर्णायक विजय मिळविला. ऑपरेशन संध्याने मालदीवला केलेली लष्करी मदत दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंध अधिक बळकट होण्यासाठी उपयुक्त ठरली. त्यानंतर दोन्ही देशात अनेक सुरक्षा करार झालेत. महासागरी क्षेत्र व त्याच्या सुरक्षिततेसाठी भारताने पर्याप्त मदत केली. समुद्रकिनाऱ्यावरील पाण्याच्या रक्षणासाठी भारताने दुर्गतीची व २६० टनाची नौका मालदीवला दिली. मालदीवच्या सर्व सव्वीस कंकणाकृती बेटांवर नवीन रडार यंत्रणा उभारली, त्याकरिता दोन हेलिकॉप्टर दिले. डिसेंबर २००४ मध्ये त्सुनामी ही नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर मालदीवला मदत करणाऱ्या देशांमध्ये भारताचा पहिला क्रमांक होता. यावेळी ३६३.१ दशलक्ष रुपयाची आर्थिक मदत केली. २००५ ते २००७ या पाच वर्षांमध्ये विकास सहकार्यासाठी भारतीय अर्थसंकल्पाच्या सरासरी ५२ टक्के इतकी मदत दिली.

दोन्ही देशात मोठ्या प्रमाणात आयात-निर्यात चालते. फेब्रुवारी १९८६ मध्ये दोन्ही देशांनी मिळून आर्थिक व तांत्रिक सहकार्यासाठी आयोग स्थापन केला. यामुळे दोन्ही देशातील व्यापार वाढला. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, मनमोहनसिंग यांनी मालदीवला आर्थिक स्थिरता देण्याचे प्रयत्न केले. त्याला मालदीवचे तत्कालीन राष्ट्रपती मोहम्मद वहीद, मोहम्मद नशीद व अब्दुल्ला यामीन अब्दुल गयूम इत्यादींनी प्रतिसाद दिला. तत्कालीन राष्ट्रपती मोहम्मद वहिद यांच्या काळात द्विपक्षीय संबंधात थोडे वितुष्ट आले, कारण भारतातील जी.एम.आर. ग्रुपकडे लिजवर देण्यासंबंधीचा केलेला करार मालदीव सरकारने रद्द केला होता.

भारताच्या आयात-निर्यातीसाठी मालदीव महत्त्वाचे केंद्र असल्याने १९७६ मध्ये या दोन्ही देशातील सागरी सीमा निश्चित केल्या गेल्या. संबंधित सीमारेषेला दळण-वळणाची निर्णायक सीमारेषा म्हणून ओळखली जाते. विशेष म्हणजे २००६ मध्ये चीनला नाविक तळासाठी जागा देण्यासंबंधी मालदीव विचार करीत असल्याचे समजल्यानंतर भारताने सागरी क्षेत्राची सुरक्षा वाढविली. मालदीवसाठी या क्षेत्रातील सर्व देश महत्त्वपूर्ण असल्याचा उल्लेख तत्कालीन राष्ट्रपती अब्दुल्ला यमीन यांनी केल्याने भारत विषयक दृष्टिकोनामध्ये अंतर पडत असल्याचे जाणवले. इथूनच मालदीव-चीन जवळीक वाढायला सुरुवात झाली. मुइज्जू यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीयांविरुद्ध वापरलेले राजकीय शब्द हे वादाचे नवे कारण ठरले. विशेष म्हणजे राष्ट्राध्यक्ष मुइज्जू यांच्या नेतृत्वाखालील नवीन सरकारने भारताने दिलेले डॉर्नियर विमान आणि हेलिकॉप्टर चालवण्यासाठी जबाबदार असलेले ८८ लष्करी कर्मचारी मागे घेण्यास कळविले. तसेच २०१९ चा जलसर्वेक्षण करारही रद्द केला. पहिल्या प्रदेश दौऱ्यासाठी त्यांनी चीनची निवड केल्याने हे सरकार चीनकडे झुकणार हे स्पष्ट झाले. मुइज्जू यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्र स्वीकारल्यानंतर नाजूक अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी मदत केल्याने भारताचे आभार मानले. मात्र, भारत आणि चीनला एका रेषेत आणले. त्यांच्या सरकारची चीन सोबत वाढती निकटता भारताच्या दृष्टीने अडचणीची ठरते आहे.

भारताला मालदीव सोबतचे आपले दीर्घकालीन संबंध नष्ट करावयाचे नाहीत म्हणूनच २०२२-२३ मध्ये १८३.१६ कोटी तर २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ७७०.९० कोटी रुपये मदत म्हणून मंजूर करण्यात आली. अशी आर्थिक मदत केल्यानंतरही मालदीव सरकारमधील एक मंत्री पंतप्रधान मोदींवर टीका करतो. यामागे डोके कोणाचे? चीन आणि मालदीवमध्ये झालेल्या करारानुसार दोन्ही पक्ष आपापल्या मूळ हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा राखण्यासाठी तसेच राष्ट्रीय सार्वभौमत्वासाठी मालदीवच्या प्रकरणांमध्ये बाह्य हस्तक्षेपाला कठोरपणे विरोध करण्यासाठी तसेच एकमेकांना भक्कम पाठिंबा देण्यासाठी वचनबद्ध आहेत. अशा प्रकारचा करार म्हणजे भारताला एक इशाराच आहे.

अशा तणावाच्या परिस्थितीत राष्ट्राध्यक्ष मुइज्जू यांनी केलेला भारत दौरा भारतासोबतचे संबंध सुधारण्यास मदत करणारा ठरेल. या दौऱ्यात राष्ट्राध्यक्षांनी आमच्या नवीन सर्वसमावेशक व्हिजन डॉक्युमेंटमध्ये विकास, सागरी सुरक्षा, व्यापार भागीदारी, ऊर्जाप्रकल्प, आरोग्य इत्यादींचा समावेश असल्याची ग्वाही दिली. भारत-मालदीव मुक्त व्यापार करारावरदेखील चर्चा सुरू असल्याचे स्पष्ट केले. इतकेच नव्हे तर त्यांनी पंतप्रधान मोदींना मालदीव भेटीसाठी आमंत्रित केले. भारताची सुरक्षा कमकुवत करण्यासाठी ते काही करणार नाहीत आणि ते दिल्लीला एक मौल्यवान मित्र मानतात, असे आश्वासन मुइज्जू यांनी दिले. अशा त्यांच्या सहकार्याच्या भूमिकेची यशस्विता काळच ठरवेल.

### चळवळ

## बहिष्कृत हितकारिणी सभा




**प्रा.डॉ. इसादास भडके**
9096364886
erbfes@gmail,com


'मूकनायक' अल्पायुषी ठरले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य सुरू होते. दामोदर हॉल, मुंबईला ९ मार्च १९२४ रोजी समाजसेवकांची बैठक झाली. त्यात संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेला 'बहिष्कृत हितकारिणी सभा' हे नाव द्यावे, असे बाबासाहेबांनी सुचविले आणि त्याला मंजुरी देण्यात आली. या संस्थेचे ब्रीदवाक्य 'Edueate, Agitade and Orgaruse' (शिकवा, चेतवा, संघटित व्हा) असे ठेवले. लोकांना सुशिक्षित करा, त्यांच्यात आपल्या हीन अवस्थेबद्दल चीड निर्माण करा आणि त्यांची संघटना उत्पन्न करा, असे या संस्थेचे ब्रीदवाक्य निश्चित करण्यात आले. त्यानंतर ही संस्था २० जुलै १९२४ ला स्थापन झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष झाले. 'बहिष्कृत हितकारिणी सभेचे सभासद वाढविण्याच्या कामाला गती आली. शनिवार-रविवारला बैठका घेऊन संस्थेचे कार्य होऊ लागले. या संस्थेची सदस्य संख्या वाढू लागली. बाबासाहेब या संस्थेच्या कार्यात एकरूप झाले. बहिष्कृत म्हणजे समाजबाह्य जे लोक आहेत त्यांना मूळ प्रवाहात आणण्याचा सतत प्रयत्न बाबासाहेबांनी केला. बाबासाहेब बहिष्कृत वर्गासाठी संस्थेचे उद्दिष्ट स्पष्ट करताना म्हणतात की, ''बहिष्कृत वर्गाच्या बुद्धीचा, कर्तव्य शक्तीचा व परिस्थितीचा ऱ्हास झाला आहे व त्यामुळे या देशाचे अपरिमित नुकसान झाले आहे. या कारणाने यथाशक्ती व यथामती निर्मूलन करण्यास्तव स्थापन झालेल्या या 'बहिष्कृत हितकारिणी सभे'स आपले पवित्र कर्तव्य समजून शक्य ती मदत करावी अशी आमची त्यास सविनय प्रार्थना आहे.'

'बहिष्कृत हितकारिणी सभा' ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पहिली संघटना निर्माण केली आणि त्या संघटनेचे उद्दिष्ट उच्च पातळीवर ठेवले. यासंदर्भात चांगदेव खैरमोडे म्हणतात की, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन उदात्त होता, कारण त्यांना भारतात एकात्मता पाहिजे होती. ते विभक्तपणाचे पुरस्कर्ते नव्हते. त्यांना हिंदूमधील विषमतेच्या निशाण्या पुसून काढून भारताला एकजिनसी बनवायचे होते. त्यांनी केलेल्या पहिल्याच संघटनेत ते प्रतिबिंब प्रकर्षाने दिसत होते. 'बहिष्कृत हितकारिणी सभे'च्या आधीपासून विविध पातळ्यांवर कार्य सुरू होते. दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाच्या परिषदेची पहिली बैठक मुक्काम माणगाव, संस्थान कागल येथे २१ व २२ मार्च १९२० ला संपन्न झाली. बैठकीच्या दुसऱ्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात छत्रपती शाहू महाराज भाषणात म्हणाले, ''माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला. याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ.आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे, तर अशी एकवेळ येईल की ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील, अशी माझी मनोदेवता मला सांगते.' भारतीय बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन ३० व ३१ मे व १ जून १९२० रोजी नागपूरला झाले. अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्काच्या मागणीसाठी होत असलेली भारतीय स्तरावरील ही पहिलीच परिषद होती. पुढे विविध ठिकाणी बहिष्कृत सभा-अधिवेशने झाली. या सर्व बहिष्कृत वर्गाच्या सभा बहिष्कृत वर्गाला समानतेचा न्याय देण्यासाठी झाल्या. यातून मोठ्या प्रमाणात जनजागृती होऊन अस्तित्वासाठीच्या लढाईस प्रोत्साहन मिळाले आणि चळवळ आकाराला येऊ लागली. यासंदर्भात धनंजय कीर लिहितात की, ''बहिष्कृत हितकारिणी संस्थेची स्थापना म्हणजे भारतातील पददलितांना स्वावलंबन, स्वाभिमान नि आत्मोद्धार याची शिकवण देऊन देशात महापरिवर्तन घडवून आणण्याच्या युगाचा प्रारंभच होय. केवळ बाह्य चळवळ करीत राहिल्याने अस्पृश्य वर्गाचा कार्यभाग होणे शक्य नाही. याची या संस्थेच्या संस्थापकांना पूर्ण जाणीव होती. आपल्या दुःसह अवगत स्थितीची अस्पृश्यांना जाणीव होण्यास ज्या ज्ञानार्जनाची जरूरी असते ते त्यांच्यापाशी नव्हती. तो अभाव लक्षात घेऊन संस्थेने आपल्या कार्यक्रमात अग्रक्रम दिला होता.''

'बहिष्कृत हितकारिणी'ने मुलांच्या सोयीसाठी वसतिगृहे चालविण्यास सुरुवात केली. १९२५ साली सोलापूर येथे वसतिगृह सुरू केले. 'सरस्वती विलास' नावाचे हस्तलिखित मासिक संस्थेकडून काढल्या जाऊ लागले. संस्थेने रात्रीची शाळा व वाचनालय चालविली. बाबासाहेबांच्या या मार्गदर्शनाने व कार्याने वेगळ्या युगास प्रारंभ व्हायला सुरुवात झाली. 'बहिष्कृत हिताकारिणी सभे'च्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जागोजागी सभेत मार्गदर्शन करून जनजागृती केली. ब्राह्मण समाजाने सातत्याने खालच्या समाजाला कसे दाबून ठेवले याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संघटनेच्या माध्यमातून करून दिली. बाबासाहेब राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून आपले समर्थ विचार मांडले.

'बहिष्कृत हिताकारिणी सभे' ची चळवळ अधिक व्यापक व्हावी, याकरिता ते सतत इतर जाती-जमातीच्या कार्यकर्त्यांच्या संपर्कात होते. या चळवळीतून बहुजन समाजाचे प्रश्नही मार्गी लागतील, ही बाबासाहेबांची दूरदृष्टी होती. म्हणून डॉ.गंगाधर पानतावणे म्हणतात की, 'मूकनायक स्मृतिशेष राहिले, या घटनेने खचून न जाता हिंदुस्थानातील नव्या परिस्थितीची आव्हाने स्वीकारून अस्पृश्यांच्या चळवळीस नवे रूप, नवी दिशा आणि नवा आकार देण्याच्या इर्षेने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संघटन आणि चळवळीची माध्यमे शोधली. १९२४ साली स्थापन झालेली 'बहिष्कृत हिताकारिणी सभा' हे त्याचेच फलित होय. '२०२४ साली या सभेला शंभर वर्ष पूर्ण झालीत. तसेच महाडच्या चवदार तळ्याच्या आंदोलनात या सभेचे मौलिक योगदान आहे.

### वाचक विचार मंच

## 'सीमकार्ड्स् ब्लॉक करण्याची सरकारी कारवाई!'

देशात दूरसंचार कंपन्यांच्या सीम कार्ड्सची विक्री बनावट कागदपत्रे सादर करून केली जात असल्याचा अंदाज येताच सरकारने तपासणी करून १.७ कोटी बनावट सीम कार्ड्स ब्लॉक केली आहेत. एअरटेल, व्होडाफोन-आयडिया, जिओ आणि बीएसएनएल या कंपन्यांची सीम कार्ड्स ही बनावट आधारकार्ड्स आणि इतर कागदपत्रे सादर करून खरीदली गेली होती असे निदर्शनास आले. त्यांचा उपयोग बहुतांशी फसवणूक करणारे, लोकांकडे व्यक्तिगत माहितीची विचारणा करणारे, काही वेळा धमकी देणारे कॉल्स, नोकरी, निवासी, व्यापारी जागांची खरेदी-विक्री करणाऱ्यांकडून संभाव्य गिऱ्हाईकांची बहुतेक वेळा फसवणूक करण्यासाठी केला जात असतो. बनावट कागदपत्रे सादर करून घेतलेल्या सीम कार्ड्सचा वापर करून ग्राहकांच्या वैयक्तिक माहितीचा संग्रह केला जातो; ज्यांचा उपयोग प्राधान्याने त्यांना व इतर लोकांना फसविण्यासाठी केला जात आहे याची कुणकुण लागताच सरकारने एआय टूल्सच्या सहाय्याने ही सीम कार्ड्स ब्लॉक तर केलीच, शिवाय त्याच तंत्रज्ञानाने दूरसंचार विभागासोबत काम करणाऱ्या ४ दूरसंचार सेवा ऑपरेटर्सनी ४५ लाख बनावट आंतरराष्ट्रीय कॉल्स दूरसंचार नेटवर्कपर्यंत पोहचण्यापासून रोखण्यात यश मिळविले आहे. या सीम कार्ड्सचा उपयोग करून उघडलेली बँक खाती आणि पेमेंट वॉलेट्ससुद्धा बनावट ठरवून ब्लॉक केली आहेत. अशा बनावट फोन्समुळे लोकांना येणाऱ्या फोनवर विश्वास ठेवणे कठीण होऊन बसले आहे. अशाप्रकारे वितरित केली जाणारी सीम कार्ड्स आणि त्यांचे व्यवहार यांच्यावर कुणाचाही ताबा राहिलेला दिसत नाही. बनावट सीम कार्ड्स विक्रीचा व्यवसाय अशा लोकांच्या हाती गेला असावा, ज्यांच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा तपास करणे येथील तपास यंत्रणांच्या आवाक्याबाहेर गेला असण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत.

तसेच सीम कार्ड्स विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांना तपास यंत्रणा आणि देशातील त्यांचे नियमन यांचा धाक राहिलेला दिसत नाही. तपास यंत्रणा त्यांची कामे करीत असतातच, पण आपल्यासारख्या फोन ग्राहकांनी नवी सीम कार्ड्स खरेदी करतांना आणि त्यांचा वापर करण्यास सुरुवात करण्यापूर्वी थेट कंपन्यांशी संपर्क साधून आपल्याला दिल्या गेलेल्या सीमची खात्रीपूर्वक तपासणी करून घ्यावी.

**स्नेहा राज**
गोरेगाव, मुंबई. मो.नं.: ९९६७०१५८९९

### गुल्लेर

## या घेऊन...




**नरेंद्र इंगळे**
9561226572


'पोरगा पाह्यजा आपल्या भासीसाठी यंदा.. दिवाळी झाल्यावर उरकून टाकू.'

'आजून झालंच नाही काय तिचं लगन?'

'नाही ना. .. पावने येतात.. खातात अन् चालले जातात.'

'किती वयाची आहे पोरगी?'

'पोरगी तीसची आहे.'

'इतका उशीर काहून लावला लगनाले?'

'पोरगी आंगात भरेल आहे. जाळी जुळी असल्यानं तिच्या लायक पोरगा सापडत नाही. आजकालचे पोरं फुकीनं उडतात.'

'एखांदी पोरगी आंगापेंडात भारी राह्यते.'

'तिचा बाप काही फिरत नाही. आमची बहीन म्हनते कसंही करून पोरीचं जमवा.'

'अशा वयस्कर पोरीचं कठीण आहे राजेहो.. सेकंडहॅंड चालते काय?'

'सेकंडहॅंड म्हनजे?'

'पोरगा दुसरपन्या आहे.'

'पोरगी वनहॅंड आहे ना. एकवरन्या पोरीले सेकंडहॅंड पाहून देता काय?'

'एवढ्या वयस्कर पोरीले वनहॅंड कसा भेटीन?'

'कोन हाय पोरगा?'

'आपला भासाच आहे. पहिल्या बायकोची फारकत झाली. ते पोरगी लय फॅशनेबल होती. तीन हजाराचे मेकप करे. मले घेऊन गाळीवर फिरा म्हने.. सहा मयन्यात गळी कचाटला. शेवटी फारकत झाली.'

'सेकंडहॅंड पोरगा भासीनं पसंत केला पाह्यजे.'

'काय होते! आपून सेकंडहॅंड गाळी घेतो. मोबाईल घेतो. काम भागते किनी!'

'गाळी पसन नसली तर दुसऱ्याले विकता येते. सेकंडहॅंड हजबंड कोनी घेते काय?'

'काही सेकंडहॅंड वस्तू चांगल्या असतात. म्या सेकंडहॅंड टिव्ही घेतला. चार वर्षापासून सुरू आहे.'

'हा पोरगा सेकंडहॅंड असला तरी जुना दिसत नाही.'

'काहून?'

'पोरगा पोरीपेक्षा दोन वर्षानं लहान आहे.'

'काय करते पोरगा?'

'पोरगा ट्रक चालवते.'

'त्याले चालते काय एवढी मोठी पोरगी?'

'वावा.. तो एवढा मोठा ट्रक चालवते अन् तुम्ही म्हनता...'

'मंग घेऊन या सकाय पोराले.. पक्कच करून टाकू. चालते आपल्याले सेकंडहॅंड.'

### धुमस

**विजयादशमी**

सुख, शांती, समाधानासंगे
यावी आयुष्यात समृद्धी
जिव्हाळ्याच्या नात्यांमध्ये
होवो उत्तरोत्तर वृद्धी

प्रत्येकाचे जीवन
कर्तृत्वाने उजळो
संकटांचा नाश व्हावा
ईडा, पीडा, टळो

पूर्ण व्हाव्या आपल्या
मनातील सर्व इच्छा
आपणा सर्वांना दसऱ्याच्या
आभाळभर शुभेच्छा

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

### संवाद

## तरुणांची लग्ने जमविण्यासाठी चीनने सुरू केले मॅरेज डिग्री कोर्सेस

चीनला आता कमी जन्मदराने पछाडले आहे. एकेकाळी चीनमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या होती. आता भारत हा सर्वात जास्त लोकसंख्येचा देश झाला आहे. चीनमध्ये आता मुलं नको ही मानसिकता आत्ता पराकोटीला गेली आहे. सरकारने अनेक प्रोत्साहनात्मक योजना मुले जन्मला घालावीत म्हणून कार्यान्वित केल्या तरीपण त्याला फारसे यश येताना दिसत नाही. या वर्षीच्या पहिल्या सहामाहीत गेल्या सुमारे ११ वर्षातील सर्वात कमी लग्नदर आहे ही बातमी नुकतीच वाचली. २०१३ नंतर सर्वात लग्न कमी अशी परिस्थिती प्रथमच निर्माण झाली आहे. चीनच्या विद्यापीठांनी यावर एक डिग्री कोर्सची निर्मिती केली असून त्याचे नाव मॅरेज सर्विस अँड मॅनेजमेंट असे आहे. या कोर्समध्ये कुटुंब समुपदेशन, उच्चस्तरीय विवाह योजना आणि मॅचमेकिंग असे विषय शिकविले जाणार आहेत. याची सुरुवात चीन आपल्या १२ राज्यातून करणार आहे. लग्ने कमी होतायेत याचे महत्त्वाचे कारण म्हणजे चीनची मंदगतीने चालणारी अर्थव्यवस्था व वाढती महागाई हीसुद्धा आहेत. मागील वर्षापेक्षा सुमारे ४.९ लाख एवढी कमी लग्ने पहिल्या सहामाहीत झाली आहेत. आता कॉलेजमध्ये डिग्री कोर्सेसमुळे लग्नदरात काय फरक होतायेत हे कळण्यासाठी आणखी एक दोन वर्षे तरी जावी लागतील. एकूणच चीनमध्ये लग्न हा प्रश्न अत्यंत अवघड झाला आहे. सरकार अनेक योजना आणत आहे, पण लोकांचा फारसा प्रतिसाद मिळत नाही आज जपानमध्येसुद्धा हाच प्रश्न समोर येत आहे. भारतात अजून तरी ही परिस्थिती नाही ही समाधानाची बाब आहे

**शांताराम वाघ**
पुणे, मो.नं. :+९१ ९६२३४५२५५३

शनिवार, १२ ऑक्टोबर २०२४ प्रहार
७ रिलॅक्स



# विद्रोही 'गटार'चा भावोत्कट थरार

१९९०-९५च्या सुमारास अतुल पेठे यांनी पुणे महानगर पालिकेतील सफाई कामगारांवर तयार केलेली "कचराकोंडी" ही डॉक्युमेंटरी बघितली आणि पुरता हादरून गेलो होतो. गटार, नालेसफाई कामगारांचे जळजळीत जीवनवास्तव याआधी कुणी कान पकडून पाहायला लावले नव्हते. त्या लघुपटाचा प्रभाव पुढे येत गेलेल्या याच आशयाच्या "पिवळा चिखल" या एकांकिकेतून आणि "अंधे जहाँ के अंधे रास्ते" या शिल्पा सावंत यांच्या नाट्याकृतीतून अधिक गडद झालेला असतानाच "गटार" समोर आले आणि सुन्न होणे काय असते हे, हा लेख लिहिण्यापर्यंत अनुभवतो आहे. आजवर अनेकदा वर्तमानपत्रातून गटार साफ करणाऱ्या कामगारांचे सफाई दरम्यान विषारी वायुमुळे घुसमटून मृत्यू झाल्याच्या बातम्या वाचायला मिळतात. १९९३ साली भारत सरकारने 'एम्प्लायमेंट ऑफ मेनहोल स्कॅवेंजर अँड कन्स्ट्रक्शन ऑफ ड्राय लॅटरिन प्रोव्हिजन ॲक्ट' बनवून सुद्धा देशातील अनेक सफाई कामगारांच्या प्रत्यक्षपणे जीवाशी खेळणे सुरूच आहे. देशातील अनेक प्रगत महापालिकांपैकी मुंबई महानगरपालिका समजली जाते, तिथेही गटारे उघडी करून सफाई कामगार स्वतःचा जीव धोक्यात घालताना उघड्या डोळ्यांनी पाहाण्यापलिकडे आपण काहीही करत नसतो. भारत सरकारने कायदा बनवून त्याची अंमलबजावणी करण्याचे हक्क डिस्ट्रीक्ट कलेक्टरला देण्यातही आले मात्र १९९३ ते २०२० पर्यंत एकही केस देशभरात दाखल केली गेलेली नाही. २००८ मध्ये मद्रास हायकोर्टानेसुद्धा हाताने गटार सफाई न करण्याचा कायदा संमत केला पण आजवर त्याची अंमलबजावणी झाल्याचे ऐकिवात नाही. अशा कायद्याकडे दुर्लक्ष करत कंत्राटी कामगारांच्या वाट्याला आलेला उत्पन्नाचा मार्ग नाईलाज म्हणूनच स्विकारला जातो. चतुर्थ श्रेणी मनपा कामगारांच्या पिढ्या या कामात ओढल्या गेल्या आणि बरबाद झाल्या. हा आशय आणि याच हेतूने प्रेरीत होऊन वीरेंद्र गणवीर यांनी २०१८ साली 'गटार' या नावाने एकांकिका स्वरूपात ही कलाकृती प्रथम रंगमंचावर आणली. पुढे या एकांकिकेचा दीर्घांक करून अनेक स्पर्धांमधून यश मिळवत बहुजन रंगभूमीला 'गटार' या एकांकिकेच्या माध्यमातून एक आवाज प्राप्त झाला. वीरेंद्र गणवीर यांची नाटककार म्हणून अलौकिक प्रतिभा या दीर्घांकातून पावला पावलांवर दिसत राहते. झॅक देरिदाने 'लोगोसेंट्रीझम' म्हणजे 'विवेकवादाची' मांडणी केली आणि या विवेकवादाने प्रभावित झालेल्या ज्ञानसंस्कृतीमध्ये अनेक परस्परविरोधी द्वंद्वे (बायनरी अपोझिशन्स) निर्माण झाली. द्वंद्वे म्हणजे परस्पर विरोधी दोन पदे. पहिल्या पदाला पूर्ण प्रतिष्ठा व दुसरे पद प्रतिष्ठाविहीन अशी ही रचना, मालक आणि दास स्वरूपात समाजात दिसून येते. ही पदरचना काही नैसर्गिक नाही त्यामुळे ती विज्ञानाच्या आणि मानसशास्त्राच्या कसोटीला उतरत नाही. मग त्यास धर्माचे लेबल लावून चाललेले शोषण आपण पाहातोच आहोत. या सिस्टीमच्या विरोधात उभे ठाकण्याचे धैर्य वीरेंद्र गणवीर यांनी आपल्या ३०-३२ वर्षांच्या कालावधीत दाखवले आहे. आंबेडकरी चळवळीशी निगडीत असलेले त्यांचे लेखनकार्य विद्रोही आहे आणि ते जाती, धर्म, वर्ग, वर्ण, वंश, ईश्वर आणि अध्यात्म या विरोधात प्रखर भूमिका मांडते. या नाटकाच्या निमित्ताने त्यांनी मांडलेला 'गटारीकरणाचा' विचार अत्यंत दाहक सत्य सांगणारा आहे.

बाबा, अम्मा, गौतम, यादव आणि रवी या पात्रांना जणू अगोदरच्या पिढ्यांकडून गटार सफाईचा वारसाच लाभल्यामुळे त्यांचे गटारीकरण झाले आहे. मात्र रवीला ते मान्य नाही. रवी महाविद्यालयीन शिक्षण घेतोय आणि त्यातूनच स्वतंत्र बंडखोर विचार करायला तो सिद्ध झालाय. मात्र सिस्टीमच्या आहारी गेलेले त्याचे भवताल त्याच्या या बंडखोरीकडे दुर्लक्ष करून गटारीकरणाच्या गुंत्यात गुरफटले जातात. रवी शेवटी म्हणतो, "गटार ही या भारताची एक अशी सीमा आहे, जिथे हे लोक आपल्या भारत देशाला स्वच्छ ठेवण्यासाठी आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत लढतात" अशा साध्या सोप्या कथाबाजाचा हा दीर्घांक.



भालचंद्र कुबल

पाचवा वेद

बदलण्याचा धगधगता निर्धार करणारा रवी हा या नाटकाचा नायक आहे. सफाई कामगारांच्या जीवनात असे असंख्य नायक निर्माण होण्याची आवश्यकता आहे. असे झाले तर केवळ नाटकातच नव्हे, तर सफाई कामगारांच्या प्रत्यक्ष जीवनातही गटारींची झाकणे बंद करणारी आंदोलने निर्माण होतील. सर्वसामान्य प्रेक्षक या नाटकात गुंततो कारण शेवटची पंधरा मिनिटं रवीने गटारात अडकलेल्या वडिलांना आणि त्यांच्या दोन साथीदारांना वाचविण्यासाठी केलेला संघर्ष. हे बचावकार्य इतके हुबेहुब वठलय की, त्याला दाद आल्यावाचून राहत नाही. गटारीकरणाच्या रात्रीचा अस्त घडवण्याचा निर्धार रवी बोलून आपले नाव सार्थकी लावण्याचा आशावाद समाजात पेरतो. या नोटवर जेव्हा हे नाटक संपते, तेव्हा आपण केवळ भारावलेल्या अंतःकरणाने आणि पाणावलेल्या डोळ्यांनी पूर्ण नटसंचाचे कौतुक करत असतो. अत्यंत सुविहीत अशा या गटारात छोट्या का होईना; परंतु खटकल्या त्या गोष्टींचा मुद्दाम उल्लेख करतोय. रवी एवढा पुरोगामी आणि बाबासाहेबांचा विचार घेऊन चालणारे कुटुंब घराबाहेर तुळशी वृंदावन का पूजते? तसेच लेखक एक कुणीतरी शैली देशपांडे आपल्या पी.एच. डी. साठी माहिती गोळा करायला आल्यामुळे सफाई कामगारांच्या जीवनमानाची इन्फो प्रेक्षकांपर्यंत पोहोचते. ही इन्फो पोहोचवण्याचा डिव्हाईस म्हणजे शैली देशपांडे. ती रवीशी बोलते, अम्मी-बाबांना प्रश्न विचारून भांबावून सोडते आणि त्यातून प्रेक्षकांना त्यांचे जीवनमान कळते. मग मला प्रश्न पडतो तो हाच की, किती काळ असले कथावस्तूला बाधा आणणारे हे डिव्हाईस आजच्या पिढीचे नवे लेखक वापरणार आहेत? त्यातही ती आनी-पानी करणारी शैली देशपांडे म्हटल्यावर थोडे आश्चर्यच वाटते. असो...

अशा काही दोन तीन खटकणाऱ्या गोष्टी सोडल्या तर गटार एक थरार आहे. नागपूरचा हा संघ मुंबईत पुन्हा येईल... तेव्हा जरुर बघा..!

# जपानी 'हायकू'चे मराठीत आगमन



ज्या विद्यापीठातून मी पहिली डिग्री घेतली, त्याच विद्यापीठाचे व्याख्यान देण्यासाठी मला आमंत्रण आले होते. होय ! नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पदव्युत्तर मराठी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी 'महाराष्ट्रातील 'हायकू'ची वाटचाल' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मला आमंत्रण होते. २०१८ साली मी 'हायकू' या विषयावर एम. फिल. केले हे विद्यापीठाला कळविले होते. नागपूर विद्यापीठात माझा व्याख्यानाचा कार्यक्रम २७ सप्टेंबर, २०२४ ला ठरला.

ठरल्याप्रमाणे मी २७ सप्टेंबरला नागपूर विद्यापीठात हजर झाले. मराठी विभागाने माझे स्वागत केले. एका हॉलमध्ये एम. ए. आणि पीएच.डी. करत असणारे विद्यार्थी शांतपणे बसून वाट पाहत होते. डॉ. अमृता इंदूरकर यांनीच माझी ओळख करून दिली व अप्रतिम सूत्रसंचालन केले. कवयित्री मनीषा अतुल या अचानक तिथे भेटल्या. काही प्राध्यापक मंडळीही येऊन बसली होती.

'हायकू' या विषयावर महाराष्ट्राला अजून पुरेशी माहिती नाही. कवयित्री शिरीष पै यांनी 'हायकू'चा प्रसार केला व त्यांची 'हायकू'वर पुस्तके आहेत एवढे मात्र सर्वांना माहीत आहे. चारोळी हा प्रकार लिहायला इतका सोपा आहे तितका 'हायकू' सोपा नाही.



फिरता फिरता

मेघना साने

खरं तर शिरीष पै यांच्याकडे मी माझ्या पहिल्या कवितेच्या पुस्तकाला प्रस्तावना मागायला गेले होते. तेव्हा माझ्या पुस्तकातील तीन ओळींच्या कवितांमध्ये काही 'हायकू' लपले आहेत, हे त्यांनी शोधून काढले होते. 'हायकू'चे शास्त्र त्यावेळी त्यांनी मला समजावून सांगितले.

'हायकू' हा जपानी स्फुट काव्याचा प्रकार ! पहिल्या दोन ओळीत समोर दिसणाऱ्या दृश्याचे वर्णन असते आणि तिसरी ओळ कलाटणी देणारी असते. तिसरी ओळ लिहिल्यानंतर जीवनाचा अर्थ उलगडून सांगितला जातो. या तीन ओळी अशा लिहायच्या असतात की, त्यात उपमा, उत्प्रेक्षा वगैरे काही येता कामा नये. केवळ समोरचे दृश्य पाहिले आहे असे वाटावे. अशा पद्धतीने लिहिले तरच तो 'हायकू' होतो.

**फुलदाणीतील फुले**
**आत्ताच घे पाहून**
**उद्या जातील कोमेजून**

काय अर्थ घ्याल या 'हायकू'तून?

"आज तारुण्य आहे. याचा आनंद आत्ताच घ्यायचा आहे. पुढे वार्धक्य येईल." एका विद्यार्थ्याने हा अर्थ सांगितला.

"बरोबर आहे. पण 'हायकू'तून उलगडणारा अर्थ आपल्या अनुभवाप्रमाणे, आपल्या स्वभावाप्रमाणे, थोडा वेगवेगळाही असू शकतो."

तो डोंगर तिथेच होता
पण वणवा पेटला
तेव्हा लोकांना दिसला

एखाद्याचे व्यक्तिमत्त्व संघर्षातच कसे उजळून निघते ते या 'हायकू'तून दिसते.

"'हायकू' हा पाच-सात-पाच अशा अक्षरबंधात असतो असे आम्ही ऐकले आहे." एका विद्यार्थ्याने विचारले.

"हो बरोबर आहे."

शिरीष पै यांनी जेव्हा 'हायकू' लिहिण्याचा प्रयत्न केला तो जपानी 'हायकू'चा इंग्रजी अनुवाद वाचून केला होता. विजय तेंडुलकरांनी त्यांना इंग्रजी 'हायकू'चे पुस्तक आणून दिले होते. आणि मराठी 'हायकू' लिहिण्याचा प्रयत्न करायला सुचविले होते. जपानी भाषेतील मूळ 'हायकू'चा अभ्यास त्यांनी त्यावेळी केला नव्हता. पण तरी 'हायकू'चा आत्मा बरोबर प्रकट होत होता. अर्थात काही वर्षांनी शिरीष पै यांनी देखील हे मान्य केले होतेच की, मराठीत पाच-सात-पाच अक्षरबंधात 'हायकू' लिहिला जाऊ शकेल.

"एखादे दृश्य डोळ्यांसमोर आणा. समजा एखादी ट्रेन येते आणि प्लॅटफॉर्मवर थांबते. मग काय घडेल?" मी विचारले.

"प्रवासी उतरतील. काही ब्रिजकडे जातील, काही स्टेशनमधून बाहेर पडतील. काही हमालांसाठी थांबतील." मुलांनी उत्तर दिले.

"चला, आता यावर लिहिलेला 'हायकू' सांगते." मी सांगू लागले.

**गाडी थांबली**
**प्रवासी उतरले**
**आणि पांगले**

काही मुलांना 'पांगले' हा शब्दच माहिती नव्हता म्हणून त्यांच्या चेहऱ्यावरती प्रश्नार्थक चिन्ह दिसले.

मग मी तोही समजावून दिला.

'हायकू'च्या इतिहासातील काही गोष्टी मला त्यांना सांगाव्याशा वाटल्या. 'हायकू' हा तीन ओळींचा छोटासा काव्यप्रकार जपानमध्ये पाचशे वर्षांपूर्वी प्रथम लिहिला गेला. बाशो, बुसन, इस्सा हे जपानमधील 'हायकू'कार जगप्रसिद्ध झाले आहेत. भारतात हा प्रकार कोणालाच सुचला नाही. त्याचे कारण काय? तर जपानमध्ये सतत भूकंप होत असल्याने जपानी लोकांची मनोरचना क्षणभानवादी झाली होती. आता समोर आहे तो क्षण खरा, पुढे काय होईल माहीत नाही. म्हणून त्या क्षणावरतीच कविता लिहितात. तेथील निसर्गही तसाच. प्लम फुलांचा बहर येतो आणि गळून जातो. त्याला 'साकुरा' म्हणतात. काही दिवस सगळीकडे निसर्ग फुललेला असतो आणि नंतर सगळी झाडे उघडी बोडके झालेली असतात. त्यामुळे स्थिर असे काहीच नाही असे वाटू लागते.

जपानने आपली बंदरे जगाला खुली केली तेव्हा 'हायकू' प्रथम जपानमधून अमेरिकेत गेला आणि मग तिथून अनेक देशांमध्ये पोहोचला.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर १९१६ साली जपान येथे गेले होते. तेथे त्यांनी 'हायकू' काव्य प्रकाराचा थोडा अभ्यास केला. भारतात आल्यावर वर्तमानपत्रात त्याबद्दल एक लेख लिहिला. मात्र भारतात, महाराष्ट्रात त्यावेळी स्वातंत्र्य चळवळी सुरू होत्या. त्यामुळे वातावरण इतके वेगळे होते की, या तीन ओळींच्या 'हायकू' नावाच्या रचनेकडे कोणी लक्ष दिले नाही. तसेही त्यावेळी महाराष्ट्रात अनेक व्यक्तींवरील दीर्घ कविता, बखरी, अध्यात्मिक कविता, संतांच्या रचना यांना साहित्य समजले जात होते. त्यामुळे या स्फुट प्रकाराकडे कोणी गांभीर्याने पाहिलेही नाही.

पुढे काव्यप्रकार विकसित होत गेला. वेगवेगळ्या प्रकारच्या रचनांना आम्ही स्वीकारले. कवी मुक्त छंदात लिहू लागले. कविवर्य सुरेश भट यांनी गझल हा काव्यप्रकार मराठीत आणला आणि शिरीष पै यांनी 'हायकू' हा प्रकार मराठीत आणला त्याचे लोकांनी स्वागत केले. शिरीष पै यांचे १९७९ ते २०१५ या काळात दहा 'हायकू' संग्रह प्रकाशित झाले.

मी लिहिलेले काही 'हायकू' येथे देत आहे.

**पालापाचोळा**
**जरा उंच उडतो**
**पुन्हा पडतो**

सामान्य माणसाच्या आयुष्यात प्रगतीचे क्षण येतात, पण काहीच काळ. पुन्हा तो खाली पडतो. अशी त्याची धडपड सुरू असते. स्ट्रगल सुरूच असतो.

'हायकू'त समोरच्या दृश्याचे वर्णन असते पण त्यातून अर्थ मात्र वेगळा निघतो. म्हणजेच ते काव्य आहे.

डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी अतिशय सुंदर असा समारोप केला. या कार्यक्रमाला कवी आरती प्रभू यांची कन्या कवयित्री हेमांगी नेरकर यादेखील उपस्थित होत्या. कार्यक्रमानंतर मी लिहिलेले 'असा बरसला 'हायकू' हे 'हायकू'चे पुस्तक विद्यार्थ्यांनी आवर्जून मागून घेतले आणि आता आम्ही लिहिलेले 'हायकू' तुम्हाला पाठवू असे कबूल केले.

**meghanasane@gmail.com**

# जुईचे 'लाईक आणि सबस्क्राईब'

जुई भागवत या नवोदित अभिनेत्रीने आपल्या अभिनयाचा ठसा प्रेक्षकांवर उमटविला आहे. मालिकेत अभिनयाची बाजी मारल्यानंतर आता ती चित्रपटात अभिनयाचा सारीपाट खेळण्यास आली आहे. 'लाईक आणि सबस्क्राईब ' या तिच्या पहिल्या चित्रपटातून ती प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.

कलाकारांच्या घरी कलाकार जन्माला येतो म्हणतात, ते खरे आहे. अभिनेत्री दिप्ती भागवत व संगीत संयोजक मकरंद भागवत यांच्या घरी जुई भागवत या कलाकाराने जन्म घेतला. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीनुसार जुईचे अभिनयाचे गुण बालपणापासून तिच्या पालकांना दिसले होते.

माहीमच्या सरस्वती मंदिर हायस्कूलमधून तिचे शालेय शिक्षण झाले. शाळेतील अनेक सांस्कृतिक कार्यक्रमात तिने भाग घेतला होता. वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धेत ती मोठ्या उत्साहाने भाग घ्यायची. विज्ञान प्रदर्शनातील पी. पी. टी.चे सादरीकरण देखील तिने चांगल्याप्रकारे केले होते. त्यामुळे तिचा आत्मविश्वास वाढतच गेला. स्टेज फियर नाहीसे झाले. त्यामुळे आज ती कॅमेऱ्यासमोर बिनधास्त वावरत असते. शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्यासाठी शाळेचा व शिक्षकांचा पाठिंबा तिला वेळोवेळी मिळत गेला. याबद्दल ती शाळेचे व शिक्षकांचे सदैव ऋणी राहणे पसंत करते.



टर्निंग पॉइंट

युवराज अवसरमल

तिने कथ्थक नृत्याचे प्रशिक्षण घेतले आहे. तिची आई अभिनेत्री असल्याने तिचे सेटवर वारंवार जाणे होतच असे. असेच एकदा 'राजा शिवछत्रपती' मालिकेच्या सेटवर असताना तिच्या मनामध्ये मालिकेमध्ये काम करण्याची इच्छा निर्माण झाली. तिने दिग्दर्शकाला सांगितले की, तिची ऑडिशन घेऊन तिला एखादी भूमिका द्यावी. तिची ऑडिशन घेतली गेली व तिची निवड लहानपणीच्या येशुबाईसाठी झाली. अशा तऱ्हेने तिचे अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण झाले. बालकलाकार म्हणून नंतर तिने काही मालिका केल्या, त्यामध्ये खेळ मांडियेला, कुलवधू या मालिकांचा समावेश होता.

तिने साठे कॉलेजमध्ये दोन वर्षे थिएटर केले. नंतर रुईया कॉलेजच्या नाट्यवलय ग्रुपमधून तिने एकांकिका केल्या. इंग्रजी साहित्यामधून तिने पदवीपर्यंतचे शिक्षण तेथे पूर्ण केले. ती रुईया कॉलेजमध्ये होती, तेव्हा झी मराठी वाहिनीचा 'महाराष्ट्राचा सुपरस्टार' हा रिॲलिटी शो आला होता. अभिनेते व दिग्दर्शक मकरंद देशपांडे, संजय जाधव होते. तिथे तिची निवड झाली, फायनलपर्यंत ती पोहोचली होती. मोस्ट एक्सप्रेसीव्ह फेसचे अवॉर्ड देखील तिला मिळाले होते.



त्यानंतर तिने सोनी मराठी वाहिनीवरील 'तुमची मुलगी काय करते' ही मालिका केली. अभिनेत्री मधुरा वेलणकरच्या मुलीची भूमिका तिने केली. तिने साकारलेली सावनी व्यक्तिरेखा खूप गाजली. लोक आज देखील तिला भेटल्यावर 'साऊ' या नावाने हाक मारतात. एका फॅनने तर तिला लांबलचक पत्रच लिहिले होते. तिच्या इंटरव्ह्यूपासून मालिकेतील प्रत्येक एपिसोडमध्ये त्याला काय आवडले हे त्याने त्या पत्रात लिहिले होते. एक वेगळाच सामाजिक संदेश देणारी मालिका होती. जुईने तरुण पिढीचे प्रतिनिधित्व केले होते. व्यसनाच्या आहारी न कळत जाण्याचा मोठा धोका त्यांच्यापुढे होता. सावनी पुढे ड्रग्सच्या आहारी जाते व नकळतपणे ड्रग्सच्या रॅकेटमध्ये अडकते. शेवटी तिची आई तिला त्यातून कशी सोडविते हे मालिकेमध्ये पाहायला मिळाले.

पुढे तिच्या आयुष्यात टर्निंग पॉइंट आला, तिला 'लाईक आणि सबस्क्राईब' हा चित्रपट मिळाला. या चित्रपटामध्ये खुशी या ब्लॉगर मुलीची व्यक्तिरेखा तिने साकारली आहे. सोशल मीडियावर ती व्लॉग अपलोड करीत असते.तिच्या सबस्क्राइबर्सना ती आयुष्यातल्या सर्व गोष्टी सांगत असते, दाखवत असते. एकदा तिने एका डेड बॉडीसोबत व्लॉग बनविला. मग काय घडत, स्कॅम होत, कोण करतंय हे सारं या चित्रपटामध्ये पाहायला मिळेल. या चित्रपटामध्ये अमेय वाघ, अमृता खानविलकर, शुभंकर तावडे यांच्यासोबत तिला काम करण्याची संधी मिळाली. सुरुवातीला तिला त्यांच्यासोबत काम करताना दडपण आले होते; परंतु अमेय वाघ, अमृताला भेटल्यावर तिचे दडपण निघून गेले. अमेय वाघ व अमृता खानविलकर दोघेही खूप व्यावसायिक आहेत. सेटवर अमेयला लागले तरी त्याचा बाऊ न करता तो लगेच शूटिंगला तयार असायचा. अमृता खानविलकर नेहमी सेटवर वेळेत यायची, तिच्याकडून वेळेचे महत्त्व जुई शिकली.

या चित्रपटाचे दिग्दर्शक अभिषेक हे हुशार असून ते कमालीचे लेखक असल्याचे जुईने सांगितले. पुढे ती म्हणाली की, या चित्रपटाच्या कथानकाचा विषय वेगळा आहे. प्रत्येक व्यक्तिरेखेची बॅक स्टोरी आहे. चित्रपटात घडतंय म्हणून काही घडत नाही, तर प्रत्येकाची काही तरी प्रेरणा (मोटिव) आहे. कथेची मांडणी खूप चांगली केली आहे, त्यामुळे दिग्दर्शन करताना ते क्लिअर होते. लेखक व दिग्दर्शक एकच असणं असे खूप कमी वेळा पाहायला मिळते. दिग्दर्शकाने कलाकारांना ती व्यक्तिरेखा साकारताना स्वातंत्र्य दिले होते, त्यामुळे प्रत्येक कलाकार त्या व्यक्तिरेखेचा अभ्यास करून त्यांचे विचार दिग्दर्शकांशी शेअर करीत होता.

हा चित्रपट सस्पेन्स, मर्डर मिस्ट्री आहे, त्यामुळे प्रेक्षक हा चित्रपट दोनदा पाहतील असा आशावाद जुईने व्यक्त केला. परेश मोकाशी या दिग्दर्शकासोबत काम करण्याची तिची इच्छा आहे. ती छान गाते, तिचा कोकणकन्या नावाचा बँड (Band)आहे, त्यामुळे संगीतप्रधान भूमिका साकारण्याची सुद्धा तिची इच्छा आहे.

ती कथ्थक शिकतेय. तिला अभिनय करायला आवडते. नृत्य, वाचन, ट्रेकिंग हे तिचे छंद आहेत. जुईला तिच्या पहिल्या 'लाईक आणि सबस्क्राईब' या चित्रपटाच्या यशासाठी हार्दिक शुभेच्छा !

# 'हाऊसफुल्ल' नाट्यगृहांचे दिवस...!

मराठी रसिकजनांच्या आयुष्याचा 'नाटक' हा अविभाज्य घटक आहे. निखळ मनोरंजन करणाऱ्या नाटकांपासून सामाजिक, वैचारिक, विनोदी, रहस्यमय, कौटुंबिक अशी विविध प्रकारची नाटके रंगभूमीवर येतात आणि त्यांचा आस्वाद घेण्यासाठी 'मायबाप' रसिकांचे पाय नाट्यगृहांकडे वळतात. वर्षाचे बाराही महिने रंगभूमीवर नाटके सुरू असतात. आठवड्याचा लेखाजोखा मांडला तर प्रामुख्याने वीकेण्डला, म्हणजे शनिवार-रविवारी नाटकांचे प्रयोग मोठ्या प्रमाणावर लागतात. त्यातही सार्वजनिक सुट्टीचे दिवस आणि सणासुदीचा मुहूर्त आला की, नाटकांचा जोर अधिक असतो.

सणासुदीचे प्रतिबिंब ज्याप्रमाणे समाजातल्या विविध घटकांवर पडलेले दिसते; त्याचप्रमाणे नाट्यसृष्टीवरही या दिवसांचा अंमल चढलेला दिसतो. सध्याचा नाट्यव्यवसाय हा बऱ्याच अंशी वीकेण्डवरच अवलंबून असताना, अशा वीकेण्डला जोडून एखादी सुट्टी आली; तर नाट्यसृष्टीसाठी तो दुग्धशर्करा योग मानला जातो. आता यावेळी शनिवारचा मुहूर्त साधून आलेला दसरा आणि दुसऱ्या दिवशीचा रविवार नाट्यसृष्टीसाठी अर्थातच महत्त्वाचा आहे. सध्या रंगभूमीवर काही पुनरुज्जीवित नाटके सुरू आहेत; तर काही नवीन नाटकांनी रंगभूमीवर ताल धरला आहे. काही नाटकांचे शुभारंभही या काळात होत आहेत. त्यांच्यासाठी तर दसऱ्याचा हा मुहूर्त महत्त्वाचा मानला जात आहे. शनिवार-रविवारची सुट्टी आणि त्यात दसऱ्याचा बोनस मिळाल्याने हा वीकेण्ड म्हणजे नाटकांसाठी बहराचा काळ आहे. अशी संधी व्यावसायिक नाटकवाले सोडणे शक्यच नसल्याने, या वीकेण्डला विविध नाट्यगृहांत मराठी नाटकांचे धडाक्यात प्रयोग लावण्यात आले आहेत. त्यामुळे या वीकेण्डला निदान नाट्यगृहे तरी नाट्यप्रयोगांनी 'हाऊसफुल्ल' झाली आहेत.



या सगळ्या पार्श्वभूमीवर, शनिवार-रविवार आणि दसऱ्याचा मुहूर्त साधत नाट्यरसिकही नाट्यगृहांच्या पायऱ्या उत्साहाने चढतील; अशी अपेक्षा आता व्यक्त झाली तर त्यात नवल नाही. श्री शिवाजी मंदिर, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिर, दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह, कालिदास नाट्यगृह ही व अशी अनेक नाट्यगृहे मिळून सकाळ, दुपार व रात्रीचे नाटकांचे प्रयोग या काळात लावण्यात आले आहेत. या प्रयोगांमुळे नाट्यगृहे तर 'हाऊसफुल्ल' झाली आहेत; आता रसिकजनही या नाटकांना 'हाऊसफुल्ल' गर्दी करतील, अशी अपेक्षा ठेवायला हरकत नाही.

# १०८ वर्षांचा संगीत 'संशयकल्लोळ'...!

तब्बल पावणेदोनशे वर्षांचा इतिहास सांगणाऱ्या मराठी नाट्यसृष्टीत संगीत नाटकांचे स्थान मोठे आहे. मागच्या अनेक पिढ्या संगीत नाटकांत मनसोक्त रमल्या आणि संगीत नाटकांच्या परंपरेची त्यांनी जपणूक केली. या संगीत नाटकांच्या मांदियाळीतले एक महत्त्वाचे आणि लोकप्रिय नाटक म्हणजे 'संगीत संशयकल्लोळ...!' नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल उर्फ गो. ब. देवल यांच्या लेखणीतून उतरलेल्या याच 'संगीत संशयकल्लोळ' या नाटकाला यंदा तब्बल १०८ वर्षे होत आहेत.



राजरंग

राज चिंचणकर

'संगीत संशयकल्लोळ' या नाटकाचा रूढार्थाने पहिला 'संगीत' प्रयोग ऑक्टोबर १९१६ मध्ये गंधर्व नाटक मंडळीने केला होता; परंतु त्यापूर्वी या नाटकाचा पहिला 'गद्य' प्रयोग, सन १८९४ मध्ये करण्यात आला होता आणि 'तसबिरीचा घोटाळा उर्फ फाल्गुनरावाचा फार्स' या नावाने तेव्हा हा प्रयोग सादर झाला होता. १९१६ पर्यंत या 'गद्य' नाटकाचे प्रयोग रंगभूमीवर होत राहिले आणि १९१६ नंतर 'संगीत संशयकल्लोळ' म्हणून या 'संगीत' नाटकाचे प्रयोग सुरू झाले.

'संगीत संशयकल्लोळ' या नाटकातल्या 'मृगनयना रसिक मोहिनी', 'संशय का मनी आला', 'मजवरी तयांचे प्रेम खरे' आदी नाट्यपदांना रसिकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. फाल्गुनराव, कृतिका, अश्विनशेठ, रेवती आदी पात्रांनी सजलेले हे नाटक म्हणजे निखळ मनोरंजनाचा प्रयोग ठरला. 'संगीत संशयकल्लोळ' या नाटकात एका तसबिरीचा घोटाळा बेमालूम गुंफण्यात आला आहे. शतकभराचा काळ उलटला तरी हा 'घोटाळा' रसिकांना आजही आकर्षित करतो, यातच या नाटकाचे महत्त्व अधोरेखित होते. यंदा या नाटकाला १०८ वर्षे होत असली तरी आजही हे नाटक 'सदाबहार' या वर्गात मोडते. हमखास मनोरंजन, या पठडीत फिट्ट बसणाऱ्या या नाटकाचे प्रयोग वेगवेगळ्या नटसंचात आजही अधूनमधून होत आहेत.



जुन्याजाणत्या नाटकमंडळींपासून, ते थेट आजच्या पिढीवरही या नाटकाची मोहिनी कायम आहे.



# 'मनमौजी' ८ नोव्हेंबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

तारुण्य हे प्रेमाचं, आकर्षणाचं असतं. म्हणूनच प्रत्येक तरुणाला कोणती ना कोणती मुलगी आवडतेच... पण मुलगी किंवा बायका न आवडणारा एखादा तरुण असेल तर? अशाच एका तरुणाची गोष्ट उलगडणाऱ्या 'मनमौजी' या चित्रपटाचे अनोखे मोशन पोस्टर नुकतेच लाँच करण्यात आले आहे. अतिशय फ्रेश लुक असलेला, तगडी स्टारकास्ट असलेला "मनमौजी" हा चित्रपट ८ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

गुलाबजाम, लॉस्ट अँड फाऊंड अशा चित्रपटांची निर्मिती केलेल्या गोल्डन गेट मोशन पिक्चर्सच्या विनोद मलगेवार यांनी "मनमौजी" चित्रपटाची निर्मिती केली आहे.

**सायली संजीव आणि भूषण पाटील यांची जोडी झळकणार**

"मनमौजी" म्हटल्यावर आपल्याला हवं तसं वागणं असं म्हणता येतं. पण चित्रपटाचा फर्स्ट लुक फार रंजक आहे. मोकळ्या वातावरणात धावत असलेल्या तरुणाबरोबर आजुबाजूच्या तरुणीही धावू लागतात आणि त्याच्या जवळ येतात. पण मनमौजी चित्रपटात, तर मुली किंवा बायका न आवडणारा तरुण नायक आहे. त्यामुळे सतत जवळ येणाऱ्या बायकांमुळे त्याचं काय होत असेल याची रंजक गोष्ट या चित्रपटात उलगडणार आहे.

# सत्ताधाऱ्यांना खुर्चीतून खाली खेचा

## डॉ.फौजिया खान — परळीमध्ये संपर्क कार्यालयाचे उदघाटन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

विजयादशमीचा दिवस हा अत्यंत चांगला दिवस संपर्क कार्यालयाच्या उद्घाटनासाठी निवडला आहे. गुंडगिरीवर सभ्यतेचा विजय, भ्रष्टाचारावर विकासाचा विजय, अनितीवर नीतीचा विजय आणि अनिष्ट गोष्टीवर सत्याचा विजय. मागील लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांना मतदारांनी त्यांची जागा दाखवून दिली आहे. आता सर्वसामान्य मतदारांचे, नागरिकांचे दिवस आले आहेत. राज्यातील युवक परिवर्तनाच्या मानसिकतेत आहेत. आगामी निवडणुकीत पक्षाच्या कार्यकर्त्यांना मेहनत घ्यावी लागेल, घरी बसून चालणार नाही. विरोधकांना आणि सत्ताधाऱ्यांना ऐन निवडणुकीच्या तोंडावर जनतेचा पुळका येऊ लागला आहे. बहिणीचा आणि शेतकऱ्यांचा कळवळा येऊ लागला आहे. मात्र या सर्व हवेतल्या योजना आहेत. शासनाच्या तिजोरीत पैसा नाही, राज्याला कर्जाच्या खाईत या शासनाने नेऊन ठेवले आहे. प्रगतीच्या मार्गावरील राज्याला अधोगतीकडे आणले आहे.



टक्केवारीचे प्रकार आपल्याला थांबवायचे आहेत. पालकमंत्र्यांना माझा प्रश्न आहे की, तुम्ही स्वतः कृषिमंत्री असताना देशात सर्वाधिक आत्महत्या तुमच्याच जिल्ह्यात का? याचे खरे कारण म्हणजे इथला भ्रष्टाचार आहे. याला तुम्हीच तर खतपाणी घातले आहे असा घणाघात डॉ.फौजिया खान यांनी धनंजय मुंडे यांच्यावर केला. मतदारसंघात रस्ते व्यवस्थित नाहीत, शेतकऱ्यांचे आणि माता भगिनिंचे हाल आहेत. आहे ते सरकार फक्त लुटण्याच्या धुंदीत आहे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात या भ्रष्टाचारी शासनाने प्रचंड लूट चालवली असून ही बाब अतिशय दुर्दैवी आहे. निवडणुकीच्या तोंडावर हे शासन योजनांचा पाऊस पडत आहे मग यागोदर त्यांनी काय केले? असा सवाल करीत त्या म्हणाल्या की, म्हणून पुढील विधानसभा निवडणुकीत त्यांना सत्तेच्या खुर्चीतून खाली खेचायचे आहे असेही त्या म्हणाल्या. युवा नेते राजेभाऊ फड यांच्या वतीने परळी वैजनाथ येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांच्या विधानसभा संपर्क कार्यालयाचा शुभारंभ आणि भव्य कार्यकर्ता मेळावा विजयादशमीच्या मुहूर्तावर पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमास पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.फौजिया खान यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राजेभाऊ फड यांनी त्यांचे स्वागत आणि सत्कार केला. तद्नंतर मतदारसंघातील अनेक गावांतून आलेल्या आणि शहरातील शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश सोहळा संपन्न झाला. प्रवेश केलेल्या सर्वांच्या गळ्यात पक्षाचा रुमाल टाकून सर्वांचे स्वागत करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजीने परिसर दणाणून सोडला होता. तालुक्यातील वाघाळा, कावळ्याची वाडी येथील

पान २ वर...


# घाटनांदरा घाटात बिबट्या दिसला

**भयभित:** वाहनधारकांमध्ये भितीचे वातावरण

सोयगाव /पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील बोरमाळ तांडा गावाजवळ घाटनांदरा घाटात शनिवारी सायंकाळी सहा वाजेपासून चक्क बिबट्या रस्त्याच्या कडेला दबा धरून बसला सिल्लोड कडून येणाऱ्या चारचाकी वाहन धारकांना बिबट्या चे दर्शन झाल्या मुळे घबराट उडाली होती घाटनांदरा घाटातील पहिल्या वळणावर हा बिबट्या रस्त्याच्या कडेला ठाण मांडून दबा धरून बसल्याचे अनेक चारचाकी वाहनधारकांना आढळून आला होता त्यामुळे घाटाच्या खालून व वरुन येणाऱ्या वाहनधारकांना सतर्कतेची माहिती देण्यात आली होती त्यामुळे सायंकाळी सात वाजेनंतर या घाटातून वाहतूक बंद करण्यात आली होती

बोरमाळ तांडा गावात बुधवरी( दि ०८) दुपारी तीन वाजता चक्क भरदुपारी राजू राठोड यांना सदर बिबट्या चे नदीच्या पात्रात दर्शन झाले होते त्यामुळे बोरमाळ तांडा गाव परिसरातील हाच तो बिबट्या घाटात गेला असावा असा अंदाज ग्रामस्थांनी वर्तविला आहे या बिबट्या ने मागील आठवड्यात तीन शेतकऱ्यांच्या



शेळ्याचा फडशा पाडला आहे त्यामुळे हा बिबट्या याच परिसरात भक्षा च्या शोधात भटकंती करत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले आहे

# प्रा.निखिल जाधव यांना डॉक्टरेट

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

फार्मसी क्षेत्रातील कार्य आणि अतुलनीय योगदानाबद्दल गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्रा. निखिल निळकंठ जाधव यांना अमेरिकेच्या वर्ल्ड पीस ऑफ युनायटेड नेशन, युनिव्हर्सिटी, कॅलिफोर्निया ( थझणछ्ण) या विद्यापीठातर्फे सन्मान म्हणून होनरी 'डॉक्टरेट' हा डिग्री किताब आणि 'विश्व मानवधिकार सुरक्षा आयोग' या जागतिक संघटनेचे सदस्यत्व मिळाले आहे.



अमेरिकेतील विद्यापीठाच्या भारतीय संपर्क कार्यालयाद्वारे हा सत्कार सोहळा दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात बॉलीवूड सेलिब्रिटी शिल्पा शेट्टी, मनोज तिवारी, बिहार चे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, सय्यद हुसेन हे सदरील कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर होते, यांच्या हस्ते हा पुरस्कार किताब वितरीत होणार होता, परंतु प्रा. डॉ. निखिल जाधव यांनी सदरील कार्यक्रमास उपस्थित न रहाता अंतरवली येथे जावून समाजसेवक संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते सत्कार आणि 'डॉक्टरेट मानद' स्वीकारली. त्याच बरोबर प्रदीप सोळंके यांनी उपरोक्त विषयाची मांडणी केली आणि मजोज जरांगे पाटील यांनी प्रा. डॉ. जाधव यांचे कौतुक केले.

औषधनिर्माण शास्त्राचे उच्च शिक्षण घेतलेल्या नंतर प्रा. निखिल जाधव यांनी काही वर्ष नामांकित औषध निर्माण करणाऱ्या कंपनी मध्ये काम केले तसेच कोविड काळात ही गरजेचे औषध रुग्णांना पर्यंत पोहचविले. अचानक झालेल्या वडीलांच्या निधनानंतर निखिल जाधव यांनी कंपिनी सोडली.

पान २ वर...

# सून आमदार अन् रुबाबर मात्र

**सवाल:** केज मतदार संघात विकासाचे तीनतेरा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघात विद्यमान आमदार नमीताताई आहेत व उद्घाटन आमदारताईचे सासरे काकाजी करतायत अस कुठ असते का असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण विद्यमान आमदारांनी परत निवडून येण्याचे स्वप्न बघण्यासाठी अनेक कामाची उद्घाटन निवडणूक तोंडावर करायला सुरुवात केली आहे उद्घाटनाचा सपाटा लावला आहे काही ठिकाणी तर उद्घाटन केल्यानंतर उद्घाटनाची पाटी सुध्दा गायब पन उद्घाटनाचा सपाटा आमदार ताईचा बंद व्हायला तयारच नाही त्या मध्ये आमदारा नमीताताई आहेत आमदारा ताईचे सासरे मध्येच उद्घाटनाची घाई



करताना दीसुन येत आहे कारण काकाजी कड नाही कुठला पद भार आहे तरी केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार यांनी काकाजींना उद्घाटन करण्याचा ठेका दीला आहे,काकाजीला उद्घाटन करण्याचा अधिकार कुणी दीला आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे व्यक्त केला जात आहे.



बीड : शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे ६९ व्या धम्म अनुप्रवर्तन दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करताना, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्यासह आदी.




# भाविकांसाठी अल्पोपहाराची सोय

डॉ.योगेश क्षीरसागरांचा उपक्रम


बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगड व शिरूर कासार तालुक्यातील नारायणगडावर दसरा मेळाव्यानिमित्त जाणाऱ्या भाविकांसाठी शहरानजिक असलेल्या सैनिकी विद्यालयासमोर मुख्य रोडलगत भाविकांसाठी स्टॉल उभारून अल्पोपहाराची सोय केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर पुढाकारातून हे नियोजन केले आहे. सैनिकी विद्यालयासमोर स्टॉल उभारून दिवसभर अल्पोपहार, पाण्याची सोय केलेली आहे. या मार्गावरून भगवान भक्तीगड, नारायणगडावर जाणाऱ्या हजारो भाविकांनी अल्पोपहाराचा लाभ घेतला. दरम्यान, डॉ.क्षीरसागर यांच्या यंत्रणेकडून स्टॉल उभारून भाविकांची उत्तम सोय केली होती.

# ठेकेदाराला चक्क सहा तास वीज परमिट

**बोंबला:** जरंडी उपकेंद्र सहा तास बंद



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील जरंडी वीज उपकेंद्रातुन चक्क खासगी ठेकेदाराला सहा तास विजेची परमिट दिल्या ने गुरुवारी सकाळी अकरा वाजेपासून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत जरंडी गावाचा गाव व शेती वीज पंप चा वीजपुरवठा ठप्प झाला होता त्यामुळे वीज ग्राहक हतबल झाले होते

जरंडी वीज उपकेंद्रातून पंधरा गावांना वीज पुरवठा करण्यात येतो परंतु खासगी ठेकेदाराला विजचे काम करण्यासाठी चक्क गुरुवारी सहा तास परमिट दिल्या मुळे जरंडी वीज उपकेंद्रचा वीज पुरवठा भरदिवसा ठप्प झाला होता कृषी पंप सह गाव पुरवठा चे फिडर बंद करून परमिट देण्यात आले त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थ हतबल झाले दरम्यान या खासगी ठेकेदाराला महावितरण च्या कोणत्या अधिकाऱ्यांनी हे परमिट दिले असा सवाल संतप्त ग्रामस्थांनी केला आहे दरम्यान या प्रकरणी सोयगावचे

पान २ वर...

# सोयगावच्या शासकीय आयटीआयचे नामकरण

**निर्णय:** हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस यांचे नाव

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस(जरंडी) यांचे नाव देण्यात आले आहे सोमवारी (दि.१४) या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण करण्यात येणार आहे

शासनाने समाज सुधारक व राष्ट्र कार्यात योगदान देणाऱ्या महान व्यक्तीचे नाव राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना देण्याच्या निर्णय घेतला आहे यामध्ये सोयगाव च्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला जरंडी येथील हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस यांचे नाव देण्यात आले आहे सोमवारी या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नामकरण करण्यात येणार असल्याचे प्राचार्य पंडित म्हस्के यांनी सांगितले जरंडी येथील हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस यांनी निजामा च्या तावडीतून मराठवाडा मुक्त करण्यासाठी हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस यांनी मोठा संघर्ष करून मराठवाडा मुक्त केला यामध्ये त्यांना छातीवर गोळी लागून त्यांनी बलिदान दिले आहे २१ आगस्ट १९४८ त्यांनी बलिदान दिले आहे.

# केज तहसीलदारांची खुर्ची कायम रिकामी?

**बोंबला:** सामान्य जनतेला पडला प्रश्न




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज नवनियुक्त तहसीलदार यांचा तोरा कलेक्टर पेक्षा जास्त आहे पन कमी नाही केजचे तहसीलदार स्वता तहसीलदार आहेत हे विसरल्या सारखे वागत आहेत कारण त्यांना केज तालुक्यातील नागरिकांनचे कामे करण्यासाठी केज तालुक्यातील प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी इतर कोणतेही काम असो काही समस्या असो संपूर्ण केज तालुक्याका सांभाळण्यासाठी प्रशासनाने तहसीलदार यांच्या कडे जबाबदारी दीलेली असते परंतु केजचे तहसीलदार यांना या गोष्टीचे भान राहीलेले नाही असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे केजचे तहसीलदार असे वागतात की कलेक्टर सुध्दा त्यांच्या सारखा वागत नाही बीड जिल्ह्याचे कलेक्टर फोन उचलतात पन

पान २ वर...

## राजश्री मुंडे — तेली समाजदांडिया महोत्सव उत्साहात

# महिलांच्या कला-गुणांना वाव

परळी पुण्यभूमी/प्रतिनिधी

महिला या दुर्गाचे रुप आहे, महिलांच्या कला गुणांना वाव देण्याची नवरात्रोत्सव सारख्या कार्यक्रमांची गरज आहे, नवरात्रोत्सव म्हणजे चांगल्या विचाराचा वाईट विचारावर विजय मिळवण्याचे प्रतिक असल्याचे प्रतिपादन सौ. राजश्री धनंजय मुंडे यांनी केले.त्या तेली समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दांडिया महोत्सवात बक्षीस वितरण कार्यक्रमात बोलत होत्या.

येथील वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात तेली समाजाच्या वतीने तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या दांडिया महोत्सवात शेवटच्या दिवशी पालकमंत्री धनंजय मुंडे




यांच्या सुविद्य पत्नी सौ. राजश्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. दांडिया मध्ये महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी होममिनीस्टर, देवीचे कथा कथन, संगीत खुर्ची, लहान मुलींचे डान्स, आनंद नगरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. या विविध स्पर्धेतील विजेत्या नवदुर्गांना सौ.राजश्री मुंडे व बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यामध्ये फ्रिज,ओहन, सोन्याची, नथ, पैठणी,ब्लूटूथ, हेडफोन आदि बक्षिसे देण्यात आली. पुढे बोलताना राजश्री मुंडे म्हणाल्या की, तेली समाजातील महिलांसाठी जे व्यासपीठ निर्माण करुन दिले आहे त्याबदल पवन फुटके व सर्व आयोजक युवकांचे अभिनंदन, या दांडिया महोत्सवाची परंपरा कायम सुरू राहण्यासाठी आवश्यक ती मदत देण्यात येईल. यावेळी

पान २ वर...

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त ध्वजारोहण

**कार्यक्रम:** गौतम नगर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन




परळी पुण्यभूमी प्रतिनिधी

६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त गौतम नगर येथे नगरसेवक केशव गायकवाड यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले.

धम्म चक्र परिवर्तन दिना निमित्त व विजया दशमी दिना निमित्त गौतम नगर येथील बुद्ध विहारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. पंचशील ध्वजारोहण सर्व भिम सैनिकांच्या उपस्थीतीत. केशव गायकवाड यावेळी म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला महान विरासत सम्राट अशोका सोबत जोडले आहे. बौद्ध धम्माची दीक्षा देऊन समता स्वतंत्रता मित्रत्व या विचारावर भारत निर्माण करण्यासाठी एक मोठा संकल्प केला. भीम सैनिकांच्या उपस्थितीत कार्यक्रम साजरा करण्यात आला.प्रभागाचे माजी नगरसेवक

पान २ वर...